**दिव्य मराठी विशेष** • जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयात दोनशेहून जास्त रुग्णांवर उपचार

# कोविड, पोस्ट कोविड रुग्णांसाठी फिजिओथेरपी फायदेशीर

प्रतिनिधी । धुळे

कोरोनामुळे श्वसनप्रणालीवर आघात होतो. फुप्फुसाची कार्यक्षमता कमी होते. श्वसनसंस्थेशी निगडित आजार व न्यूमोनियामुळे फुप्फुसांमध्ये पाणी किंवा पस भरतो. त्यामुळे श्वास घेताना त्रास होतो. कधीकधी अशक्तपणाही जाणवतो. हा आजार बळावल्यास फुप्फुसांचा फायब्रॉसिस होण्याचा धोका संभवतो. त्यामुळे कोरोनावरील उपचारानंतर फुप्फुस व श्वसनाचे स्नायू बळकट करणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी शहरातील एसीपीएम मेडिकल कॉलेजमध्ये फिजिओथेरपीद्वारे श्वसन संस्था बळकटीकरणावर भर देण्यात येत आहे. त्याचा चांगला परिणाम दिसून येतो आहे.

कोरोनाबाधितांची संख्या झपाट्याने वाढते आहे. त्यामुळे कोविड व पोस्ट कोविड उपचारांमध्ये फिजिओथेरेपीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. जवाहर फाउंडेशनच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रशासनाने कोविड रुग्णांवरील उपचारांत फिजिओथेरपीचा समावेश केला आहे. कोरोना झालेल्या दोनशेपेक्षा जास्त रुग्णांवर फुप्फुसाच्या फिजिओथेरपीद्वारे उपचार करण्यात आले. या थेरपीमुळे रुग्णांच्या फुप्फुसाची कार्यक्षमता वाढून रुग्ण झपाट्याने बरे होत असल्याचे लक्षात आले. फुप्फुसांची फिजिओथेरपी कोविड पॉझिटिव्ह व कोविड बरा झाल्यानंतर करता येते. ऑक्सिजन पातळी ९० टक्क्यांच्या खाली असणाऱ्या रुग्णांमध्ये ही थेरपी आवश्यक ठरते. कोरोना संसर्गाची लक्षणे सौम्य, मध्यम व तीव्र असतात. त्यात सौम्य व मध्यम लक्षणे असणाऱ्या रुग्णांमध्ये फिजिओथेरपीचे अत्यंत चांगले परिणाम दिसून येत आहेत.

## हे होतात फायदे

फुप्फुसाच्या फिजिओथेरपीमुळे श्वसननलिका खुली राहते. फुप्फुसांची श्वास घेण्याची क्षमता वाढवते. श्वासांच्या स्नायूंची ताकद वाढते. दम व धाप लागणाऱ्या रुग्णांमध्ये श्वासाची गती सामान्य होते. छातीची हालचाल सामान्य होते. फुप्फुसांचे वायुविजन आणि वायुविनिमय सुधारते. शरीराची मुख्यत: पाठीची अनैसर्गिक ठेवण किंवा वाक सुधारतो.

## या व्यायामांचा समावेश, रुग्ण होतात लवकरच ठणठणीत

फुप्फुसांच्या फिजिओथेरपी उपचारात विश्रांती तंत्र, पर्सड लिप म्हणजेच श्वसन क्रिया-ओठ दुमडून श्वसनक्रिया, वक्षीय विस्तार, छातीचे हालचाल वाढवणारे व्यायाम, वायुविजन करणाऱ्या स्नायूंचे प्रशिक्षण जसे की – स्पायरोमेट्री, ओटीपोटापासून श्वसनक्रिया, शरीर विशिष्ट स्थितीत ठेवून बेडके स्रावांचा निचरा करणे यात पालथे झोपण्याने विशेष फायदा होतो. श्वसन सामान्य ठेवत रुग्णांची हालचाल वाढवणे आदी व्यायाम केले जातात. फिजिओथेरपीस सहकार्य करणारे रुग्ण लवकर बरे होत असल्याचे दिसून आले आहे.

## फिजिओथेरपी महत्त्वाची, अनेकांना होतोय फायदा

*अति ताणतणाव आल्यास शरीर ताण संप्रेरक निर्माण करते. त्यामुळे हृदयविकार व पक्षाघाताचा धोका संभवतो. त्यामुळे समुपदेशन आणि विश्रांती आवश्यक असते. त्याचबरोबर फिजिओथेरपी महत्त्वाची आहे. स्पायरोमीटर हे यंत्र बाजारात सहजपणे उपलब्ध आहे. ज्याच्या वापरामुळे जंतुसंसर्गापासून होणाऱ्या फुप्फुसाच्या आकुंचनास प्रतिबंध करता येते. शिवाय स्राव बाहेर काढण्यास मदत होऊन फुप्फुसाची क्षमता वाढते. त्यामुळे रुग्णांची ऑक्सिजन पातळीही वाढण्यास मदत होते.*

**-डॉ.हर्षदा पाठक,**
फिजिओथेरपीस्ट, एसीपीएस मेडिकल कॉलेज

लोकमत

# कोरोना योद्धांचा 'जवाहर'तर्फे सत्कार

## रूग्णसेवेच्या कार्याची घेतली दखल

■ लोकमत न्यूज नेटवर्क

धुळे : जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये मेडिसीन विभागातर्फे कोरोना काळात सेवा बजावलेल्या कोविड योद्धांचा सत्कार करण्यात आला. जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या सहसचिव संगीता पाटील, डॉ. ममता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, मेडिसीन विभाग प्रमुख डॉ. दिलिप पाटील, डॉ. रोहन कुलकर्णी आदी मान्यवरांनी यावेळी सत्कार केला.

औषधी विभागातर्फे आयोजित मंथली मेडिसीन मीट या कार्यक्रमात शंभराहून अधिक कोविड योद्धांचा यावेळी गौरव करण्यात आला. याशिवाय एम्प्लॉयी ऑफ द मंथ हा पुरस्कार देवूनही आयसीयू विभागातील कर्मचा-यांचा सत्कार करण्यात आला. कोरोनाच्या कठीण कालावधीत शासकीय हिरे मेडिकल कॉलेजचा अतिरिक्त भार सांभाळत



सत्कार करतांना मान्यवर.

असतांना १०० ऑक्सिजनबेडेड डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरमध्ये डॉक्टर्स, नर्सेस, सफाई कर्मचारी तसेच कॉलेजचे कर्मचारी यांनी अहोरात्र सेवा बजावली. यामुळे रूग्ण बरे होण्याचे प्रमाण ९४ टक्क्यांपर्यंत गेले. प्रतिकुल परिस्थतीचा सामना करत असतांना रूग्णालयातील अनेक डॉक्टर्स तसेच नर्सेसला कोरोनाची लागण झाली. अशा परिस्थीत कार्य करणार्या कर्मचारयांचा सत्कार करण्यात आला.



# जवाहर फाऊंडेशनच्या योगदानाची इतिहासात नोंद होणार -ना.सत्तार

## १०० बेडच्या डेडिकेटेड कोविड सेंटरचे उद्घाटन





**धुळे ★खान्देश खबर वृत्त★**

कोरोनाच्या वाढत्या प्रादूर्भावात हिरे मेडिकल कॉलेजचा संपूर्ण भार आपल्याकडे घेवून जवाहर मेडिकल फाउंडेशनने शासनाला सहकार्य केलेले आहे, केवळ सात दिवसात संपूर्ण सुविधांनी युक्त १०० बेडचे डेडिकेटेड कोविड सेंटर उभारून मोठे योगदान दिलेले आहे. जवाहर फाउंडेशनच्या या कार्याची इतिहासात नोंद होईल असे मत धुळे जिल्हयाचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी मांडले.जवाहर फाउंडेशनच्या १०० बेडच्या कोविड सेंटरच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी मंत्री रोहिदास पाटील, जवाहर फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.भाईदास पाटील, आ. कुणाल पाटील, आ. मंजुळा गावित, जिल्हा अधिकारी संजय यादव, पोलिस अधिक्षक चिन्मय पंडीत, आयुक्त अजीज शेख, सीईओ वान्मती सी. अप्पर पोलिस अधिक्षक डॉ.राजू भुजबळ, उपायुक्त गणेश गिरी, शांताराम गोसावी, जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या **(पान ४ वर)**

ठी

री

# द्ध्यांचा सन्मान



# जवाहर फाउंडेशनच्या योगदानाची ...

**(पान १ वरुन)** सहसचिव संगीता पाटील, ममता पाटील, अधिष्ठाता डॉ.विजय पाटील, उपअधिष्ठाता डॉ.आरती कर्णिक, डेंटल कॉलेजचे डिन डॉ.अरूण दोडामनी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख हिलाल माळी, माजी जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, धीरज पाटील, डॉ. तुळशीराम गावित आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी ना.अब्दुल सत्तार यांनी जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या कामाचे कौतुक करतानांच माजी मंत्री रोहिदास पाटील यांनी महाराष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. श्री शिवाजी विद्या प्रसारक मंडळ तसेच जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून ते धुळे जिल्हयातील जनतेला सेवा देत असल्याने त्यांचा सार्थ अभिमान असल्याचे सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार कुणाल पाटील मागील दहा वर्षांपासून सभागृहात विविध प्रशनांवर आवाज उठवित असल्याचेही ते म्हणाले. पाण्यामुळे हॉस्पिटलकडे जाणारा रस्ता वाहून गेला या रस्त्यासाठी तातडीने ३८ लाख रूपयांच्या कामाला मंजुरी देण्यात आल्याचे ते म्हणाले. पुढील दोन महिन्यात हा रस्ता तयार करण्यात येईल असेही ते यावेळी म्हणाले. कोविड सेंटरचा परिसर अल्हाददायक असून याठिकाणच्या वातावरणामुळे रूग्ण तातडीने बरा होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. हॉस्पिटलचे संचालक, स्टाफ यांचेही त्यांनी आभार मानले. केवळ सात दिवसात रात्रंदिवस काम करून उभारलेल्या कोविड सेंटरचे काम पाहून पालकमंत्री भारावून गेले. जिल्हयातील सर्वात सुंदर कोविड सेंटर असल्याचे ते म्हणाले. या कोविड सेंटरसाठी सर्वप्रकारची मदत करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. दरम्यान जिल्हाधिकारी संजय यादव, पोलिस अधिक्षक, सीईओ, महापालिका आयुक्त यांनी एकत्रित येवून उत्तमप्रकारे नियोजन केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. जवाहर मेडिकल फाउंडेशनला लागणारी सर्व प्रकारची मदत शासनाकडून करण्यात येणार असल्याचेही पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले. यावेळी पालकमंत्री तसेच अन्य मान्यवरांचा जवाहर मेडिकल फाउंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी माजी मंत्री रोहिदास पाटील, डॉ.भाईदास पाटील, आमदार कुणाल पाटील आदींनी मान्यवरांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. कार्यक्रमात प्रत्येकाला मास्क लावणे तसेच सोशल डिस्टसींग पाळणे बंधनकारक करण्यात आले होते.

**हे कोविड सेंटर नरीमन पॉईंटवर असल्यासारखे वाटते**

जवाहर मेडिकल फाउंडेशनचे कोविड सेंटर पाहत असतांना खिडकीकडे गेल्यानंतर पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी नकाने तलावचा परिसर पाहिल्यानंतर हे कोविड सेंटर मुंबईच्या नरीमन पॉईंटवर असल्यासारखे वाटते. हा नजारा प्रचंड सुंदर असल्याचे ते म्हणाले. पर्यावरणाशी समरूप असलेले हे कोविड सेंटर निश्चितच आदर्शवत ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



# जवाहर कोविड हेल्थ केअर सेंटरचे उदघाटन



जवाहर मेडिकल फाऊंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयात कोविड हेल्थ केअर सेंटरचे उदघाटन पालकमंत्री श्री. सत्तार यांच्या हस्ते करण्यात आले. या सेंटरमध्ये ऑक्सिजनयुक्त १०० बेड आहेत. यावेळी फाऊंडेशनचे चेअरमन डॉ. भाईदास पाटील, उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, माजी मंत्री रोहिदास पाटील, जिल्हाधिकारी श्री. यादव यांच्यासह वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. सत्तार यांनी कोविड सेंटरची पाहणी केली.

धुळे । शनिवार, १५ ऑगस्ट २०२० ♦ www.khandeshmaidan.com ♦ email :khandeshmaidan@gmail.com • व्हाट्सअप नं. 90218 15202

• वर्ष : ७ • अंक : ८१ • पृष्ठे : ४ • मूल्य : ₹ १/- ❑ धुळे । नंदुरबार । जळगाव । नाशिक येथून एकाच वेळी वितरित. • Post Reg.No.DHL/499/2019-2021 • RNI Reg. No. MAHMAR/2014/55868

''ऐ मेरे वतन के लोगों जरा
आँख में भर लो पानी।
जो शहीद हुए हैं उनकी
जरा याद करो कुर्बानी।''
स्वातंत्र्यदिन चिरायू होवो...

• मुख्य संपादक : मनोज गर्दे
(मोबा.८८३०१५५२७४/९७६४४७६८२२)
अर्धतपपूर्ती सांजदैनिक
# खान्देश मैदान

# जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या योगदानाची इतिहासात नोंद होणार

## पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते १०० बेडच्या डेडिकेटेड कोविड सेंटरचे उदघाटन

**धुळे, (रिपोर्टर) :** कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावात हिरे मेडिकल कॉलेजचा संपूर्ण भार आपल्याकडे घेवून जवाहर मेडिकल फाउंडेशनने शासनाला सहकार्य केलेले आहे. परंतु, केवळ सात दिवसांत संपूर्ण सुविधांनी युक्त १०० बेडचे डेडिकेटेड कोविड सेंटर उभारुन मोठे योगदान दिलेले आहे. जवाहर फाउंडेशनच्या या कार्याची इतिहासात नोंद होईल, असे मत धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी शनिवारी व्यक्त केले. जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या १०० बेडच्या कोविड सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.





यावेळी माजी मंत्री रोहिदास पाटील, जवाहर मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, आमदार कुणाल पाटील, साक्रीच्या आमदार सौ. मंजुळा गावित, जिल्हाधिकारी संजय यादव, पोलिस अधीक्षक चिन्मय पंडित, मनपा आयुक्त अजीज शेख, जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी वान्मती सी., अप्पर पोलिस अधीक्षक डॉ.राजू भुजबळ, उपायुक्त गणेश गिरी, उपायुक्त शांताराम गोसावी, जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या सहसचिव संगीता पाटील, ममता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, उपअधिष्ठाता डॉ.आरती कर्णिक, डेंटल कॉलेजचे डिन डॉ.अरुण दोडमनी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख हिलाल माळी, अतुल सोनवणे, धीरज पाटील, डॉ. तुळशीराम गावित आदी उपस्थित होते.

यावेळी ना.अब्दुल सत्तार यांनी जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या कामाचे कौतुक करतानाच माजी मंत्री रोहिदास पाटील यांनी महाराष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. श्री शिवाजी विद्या प्रसारक मंडळ तसेच जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून ते धुळे जिल्ह्यातील जनतेला सेवा देत असल्याने त्यांचा सार्थ अभिमान असल्याचे सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आ. कुणाल पाटील मागील दहा वर्षांपासून सभागृहात विविध प्रश्नांवर आवाज उठवित असल्याचेही ते म्हणाले. पाण्यामुळे हॉस्पिटलकडे जाणारा रस्ता वाहून गेला. या रस्त्यासाठी तातडीने ३८ लाख रुपयांच्या कामाला मंजुरी देण्यात आल्याचे ते म्हणाले. पुढील दोन महिन्यांत हा रस्ता तयार करण्यात येईल, असेही ते यावेळी म्हणाले. कोविड सेंटरचा परिसर आल्हाददायक असून या ठिकाणच्या वातावरणामुळे रुग्ण तातडीने बरा होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. हॉस्पिटलचे संचालक, स्टाफ यांचेही पालकमंत्र्यांनी आभार मानले. केवळ सात दिवसांत रात्रंदिवस काम करून उभारलेल्या कोविड सेंटरचे काम पाहून पालकमंत्री भारावून गेले. जिल्ह्यातील सर्वात सुंदर कोविड सेंटर असल्याचे ते म्हणाले. या कोविड सेंटरसाठी सर्वप्रकारची मदत करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

जवाहर मेडिकल फाउंडेशनचे कोविड सेंटर पाहत असताना खिडकीकडे गेल्यानंतर पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी नकाणे तलावचा परिसर पाहिल्यानंतर हे कोविड सेंटर मुंबईच्या नरीमन पॉईंटवर असल्यासारखे वाटते. हा नजारा प्रचंड सुंदर असल्याचे ते म्हणाले. पर्यावरणाशी समरुप असलेले हे कोविड सेंटर निश्चितच आदर्शवत ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, जिल्हाधिकारी संजय यादव, पोलिस अधीक्षक, सीईओ, महापालिका आयुक्त यांनी एकत्रित येवून उत्तमप्रकारे नियोजन केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. जवाहर मेडिकल फाउंडेशनला लागणारी सर्व प्रकारची मदत शासनाकडून करण्यात येणार असल्याचेही पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले. यावेळी पालकमंत्री तसेच अन्य मान्यवरांचा जवाहर मेडिकल फाउंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी मंत्री रोहिदास पाटील, डॉ.भाईदास पाटील, आ. कुणाल पाटील आदींनी मान्यवरांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. कार्यक्रमात प्रत्येकाला मास्क लावणे तसेच सोशल डिस्टसींग पाळणे बंधनकारक करण्यात आले होते.

# विलगीकरण कक्षाला सीईओंची भेट

**धुळे** : जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडीकल कॉलेज आणि रुग्णालयात तयार करण्यात आलेल्या कोरोना विलगीकरण कक्षाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वान्मथी सी. यांनी काल अचानक भेट दिली. त्यांच्यासमवेत जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. शिवराम सांगळे उपस्थित होते.


(छाया : पुण्य)

राज्यात कोरोना विषाणू संसर्ग वेगाने पसरत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातही आवश्यक ती सतर्कता बाळगण्यात येत आहे. त्याअनुषंगाने जवाहर फाउंडेशनने पुढाकार घेऊन तब्बल ४४ खाटांचा विलगीकरण कक्ष तयार केला आहे. या कक्षाची पाहणी करुन सीईओंनी समाधान व्यक्त केले. यावेळी आवश्यक ती सतर्कता आणि काळजी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. जवाहर मेडीकल फाउंडेशनचे चेअरमन डॉ. भाईदास पाटील, व्हा.चेअरमन आ. कुणाल पाटील, डॉ. ममता पाटील, सहसचिव संगीता पाटील, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, उपप्राचार्य डॉ. आरती महाले, निंबा मराठे यांच्यासह प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते, जनसंपर्क अधिकारी प्रवीण खरे आदी उपस्थित होते.

# जवाहर फाउंडेशनमधील करोना वॉर्डला सीईओंची अचानक भेट



## सीईओ वानमती सी. यांनी संसर्गित रुग्णांची काळजी घेण्याचे केले आवाहन

धुळे । प्रतिनिधी

राज्यात करोना विषाणू संसर्ग वेगाने पसरत असल्याच्या पार्श्वभूमीवर धुळे शहरातही आवश्यक ती सतर्कता बाळगण्यात येत आहे. करोनाशी लढा देण्यासाठी आवश्यक ती काळजी प्रशासनाकडून घेण्यात येत आहे. जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात तयार करण्यात आलेल्या करोना क्वारंटाइन वॉर्डची जिल्हा परिषदेच्या सीईओ वानमती सी. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शिवराम सांगळे यांनी अचानक भेट देत पाहणी केली.यावेळी योग्य ती माहिती त्यांनी जाणून घेतली. तब्बल ४४ खाटांचा वॉर्ड पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी आवश्यक ती सतर्कता आणि काळजी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. संशयित रुग्ण आढळल्यास अथवा रुग्णालयात संशयितांच्या संसर्गात आलेल्या रुग्णांवर उपचार आणि देखरेख करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी जवाहर मेडिकल फाउंडेशन चे चेअरमन डॉ. भाईदास पाटील, व्हाईस चेअरमन तथा आमदार कुणाल पाटील, डॉ.ममता पाटील,सहसचिव संगीता पाटील रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, उपप्राचार्य डॉ. आरती महाले, निंबा मराठे, विलास पाटील यांच्यासह प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते जनसंपर्क अधिकारी प्रवीण खरे आदी उपस्थित होते. जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम रुग्णालयात तयार करण्यात आलेल्या सुविधांचे त्यांनी यावेळी कौतुक केले.

LTE 34% 7:26 AM



**धुळे : जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या हॉस्पिटलमधील कोरोना विलगीकरण कक्षाची पाहणी करताना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वान्मती सी. व मान्यवर.**

# कक्षाची 'सीईओं'कडून पाहणी

धुळे, ता. १६ : जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व रुग्णालयातील कोरोना विलगीकरण कक्षाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वान्मती सी. यांनी आज अचानक भेट दिली. कक्षाबाबत माहिती जाणून घेत संशयित रुग्ण आल्यास आवश्यक उपचार व दक्षता घेण्याचे आवाहन केले. एसीपीएम मेडिकल कॉलेजमध्ये ४४ खाटांचे कोरोना विलगीकरण कक्ष सुरू केला आहे. या कक्षाची सीईओ वान्मती सी., जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शिवराम सांगळे यांनी आज अचानक पाहणी केली. तब्बल ४४ खाटांचा वॉर्ड पाहून वान्मती सी. यांनी समाधान व्यक्त केले. संशयित रुग्ण, संशयितांच्या संसर्गात आलेल्या रुग्णांवर उपचार आणि देखरेख करण्याचे त्यांनी आवाहन केले. जवाहर मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, डॉ. ममता पाटील, सहसचिव संगीता पाटील, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, उपप्राचार्य डॉ. आरती महाले, निंबा मराठे, प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते, जनसंपर्क अधिकारी प्रवीण खरे आदी उपस्थित होते.

# हिरे मेडिकलमध्ये उद्यापासून फक्त कोरोनाबाधितांची तपासणी, उपचार

## एसीपीएममध्ये नॉन कोविड रुग्णांवर उपचार; बैठकीत घेण्यात आला निर्णय

**प्रतिनिधी** | धुळे

शहरातील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाला कोविड रुग्णालय म्हणून घोषित केले आहे. याठिकाणी सोमवारपासून (दि.८) पासून फक्त कोरोना रुग्णांची तपासणी व त्यांच्यावर उपचार केले जातील. तसेच नॉन कोविड अर्थात अन्य आजाराच्या रुग्णांवर जवाहर फाउंडेशनच्या अण्णासाहेब चुडामण पाटील मेडिकल कॉलेजमध्ये उपचार होतील.

कोरोनाबाधित रुग्णांवर स्वतंत्रपणे व योग्य उपचार व्हावे यासाठी कोविड व नॉनकोविड रुग्णांची व्यवस्था स्वतंत्र ठिकाणी करावी, असे निर्देश शासनाकडून देण्यात आले होते. त्यानुसार यापूर्वीच भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे कोविड रुग्णालय म्हणून घोषित करण्यात आले होते. मात्र, अन्य रुग्णांच्या उपचारासाठी शहरात सोय नसल्याने कोरोनाबाधितांसह अन्य आजाराच्या रुग्णांवर हिरे महाविद्यालयातच उपचार सुरू होते. कोविड व नॉन कोविड रुग्णांवर स्वतंत्र ठिकाणी उपचार करण्याची सूचना महिनाभरापूर्वीच पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिली होती. त्यानंतरही अन्य रुग्णांची सोय होत नव्हती. गेल्या आठवड्यात पालकमंत्र्यांनी घेतलेल्या बैठकीत हा मुद्दा चर्चेत आला. त्यावेळी पुन्हा पालकमंत्र्यांनी सूचना दिल्या. त्यानुसार जिल्हाधिकारी संजय यादव यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी बैठक झाली. बैठकीला वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ.पल्लवी सापळे, महापालिकेचे आयुक्त अजिज शेख, कोविडचे समन्वयक डॉ. दीपक शेजवळ, एसीपीएम कॉलेजच्या संचालक डॉ. ममता पाटील, प्राचार्य डॉ. विजय पाटील, आयएमएचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. रवी वानखेडकर, धुळे आयएमएच्या अध्यक्षा डॉ. जया दिघे, डॉ.विजय पाटील आदी उपस्थित होते.

बैठकीत चर्चेनंतर कोविड व नॉन कोविड रुग्णालय स्वतंत्र असावेत असे ठरले. त्यानुसार हिरे वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय सोमवार (दि.८) पासून केवळ कोविड रुग्णालय म्हणून कार्यान्वित केले जाणार आहे. याठिकाणी कोरोना तपासणी आणि बाधित रुग्णांवर उपचार केले जातील. त्यासाठी आयसीयू विथ व्हेंटिलेटर्स, ऑक्सिजन व्यवस्था, सीटी स्कॅन, एक्स-रे, सोनोग्राफी आदी सोयी-सुविधा उपलब्ध असतील. तसेच शहरातील अण्णासाहेब चुडामण पाटील स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय फक्त नॉन कोविड रुग्णालय असेल. या ठिकाणी नॉन कोविड रुग्णांची तपासणी करून त्यांना दाखल केले जाईल, अशी माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली.

### समन्वयकांची केली नियुक्ती...

*ताप, खोकला अशी कोविडसदृश लक्षणे असतील किंवा जे कोरोना बाधिताच्या संपर्कात आलेले असतील अशा नागरिकांवर सोमवारपासून हिरे मेडिकल कॉलेज व सर्वोपचार रुग्णालयात उपचार करण्यात येतील. इतर आजाराच्या रुग्णांवर एसीपीएमच्या रुग्णालयात उपचार होणार आहे. समन्वयक म्हणून डॉ.दीपक शेजवळ हे जबाबदारी सांभाळणार आहेत.*

**-डॉ.पल्लवी सापळे,** अधिष्ठाता, हिरे मेडिकल कॉलेज.

लोकमत

# घाबरू नका पण जागरूक रहा !

## अभियान । जवाहर व महापालिकेतर्फे शहरात जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** जवाहर मेडिकल फाउंडेशन तर्फे व्यापक जनजागृती सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन जवाहर मेडिकल फाउंडेशन व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात होर्डिंग लावण्यात आले आहे. त्याद्वारे नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.





मनपा व जवाहर हॉस्पिटलतर्फे शहरात लावण्यात आलेले होर्डिंग

करोना विषाणूचा वाढता संसर्ग लक्षात घेऊन शहरात जवाहर मेडिकल फाउंडेशन तर्फे चाळीस खाटांचा करोना व्हायरस तयार करण्यात आलेला आहे. हा संसर्ग रोखण्यासाठी नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी गर्दीत जाणे टाळावे तसेच हातांची स्वच्छता नियमित करावी. संसर्ग झाल्यास त्वरित उपचार करण्यासाठी रुग्णालयात दाखल व्हावे कोणतीही गर्दीचे कार्यक्रम यात सहभागी होणे टाळावे असे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात आले आहे.

लोकमत

# कोरोनाला घाबरून जावू नका, पण दक्षता घ्या !

## धुळेकरांनी भीती बाळगु नये.



समाज माध्यमात पसरत असलेल्या अफवांना बळी पडू नका. कोरोनाचा सामना करण्यासाठी हिरे वैद्यकीय महाविद्यालयातील आवश्यक ती सर्व यंत्रणा सज्ज झालेली आहे. कोरोना या आजारासंदर्भात ाागरिकांनी भीती बाळगू नये.

**- डॉ. नागसेन रामराजे,**

अधिष्ठाता,भाऊसाहेब हिरे वैद्यकीय

## वेळोवेळी हात स्वच्छ धुवा




एन ९५ मास्क रुग्णालयात पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. मास्क किंवा साध्या रुमालाचाही वापर नागरिक करु शकतात. वेळोवेळी हात धुवावेत व आणि स्वत:ची काळजी घेत स्वछता राखावी.

**- डॉ. राजकुमार सूर्यवंशी,**

वैद्यकीय अधीक्षक

## परिसरात स्वच्छता ठेवावी



मनपा आरोग्य केंद्रातर्फे आजाराबाबत जनजागृती केली जात आहे. नागरिकांनी देखील खबरदारी घेण्यासाठी स्व:ताचा व परिवाराचा बचा करण्यासाठी स्वच्छता ठेवण्याची गरज आहे.

**-डॉ. महेश मोरे,**

आरोग्य अधिकारी, महापालिका

## कोरोनासाठी जिल्हा प्रशासन सज्ज



कोरोना आजाराबाबत जिल्हा प्रशासनाकडून विशेष दक्षता घेण्यात आली आहे. त्यासाठी जवाहर हॉस्पिटल व भाऊसाहेब हिरे वैद्यकीय रुग्णालयात बेडची व्यवस्था केली आहे. नागरिकांनी देखील स्व:ताची काळजी घ्यावी

**-डॉ. माणिक सांगळे,**

जिल्हा शल्यचिकित्सक,

## सार्वजनिक ठिकाणी गर्दी टाळावी



कोरोना व्हायरस पासुन बचाव करण्यासाठी नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी जाणे टाळावे, हातपाय वेळोवेळी धुवावे, सर्दी, ताप, खोकला आल्यास घाबरुन जाता. रुग्णालयात जावून वैद्यकीय उपचार तातडीने घ्यावा.

**-डॉ. विजय पाटील**

अधिष्ठाता, जवाहर मेडिकल महाविद्यालय

## खबरदारी घेण्याची गरज



लहान मुलांना हातपाय स्वच्छ धुतल्याशिवाय हातात घेऊ नये. मुलांचा व स्व:ताचा बचाव करण्यासाठी खबरदार घ्यावी.

**डॉ. अभिनय दरवडे**

बालरोग तज्ञ

# धुळे पालिका प्रशासन सज्ज



म. टा. वृत्तसेवा, धुळे

धुळे महापालिका आणि जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल करोनाच्या मुकाबल्यासाठी सज्ज झाले आहे. त्यासाठी तब्बल ४० खाटांच्या करोना वॉर्डचे महापालिका आयुक्त अजीज शेख यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

याठिकाणी यावेळी उपायुक्त गणेश गिरी, जवाहर मेडिकल फाउंडेशनचे चेअरमन डॉ. भाईदास पाटील, व्हाइस चेअरमन आमदार कुणाल पाटील, सहसचिव संगीता पाटील, डॉ. ममता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. महेश मोरे, उपप्राचार्य डॉ. आरती महाले, प्रा. डॉ. नितीन कुलकर्णी, प्रा. डॉ. शर्मा आदी उपस्थित होते.

या उपक्रमासाठी निंबा मराठे, प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते, जनसंपर्क अधिकारी प्रवीण खरे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी आयुक्त शेख यांनी करोनाशी सामना करण्यासाठी प्रशासन तयार असून योग्य ते आवश्यक उपाय करण्यात येत आहे, असे सांगितले.

दरम्यान धुळ्यातील करोना संशयितांचे नमुने पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आल्याचीही माहिती देण्यात आली.

सकाळ

# ‘जवाहर’च्या हॉस्पिटलमध्ये कोरोनाग्रस्त रुग्णांसाठी कक्ष

**सकाळ वृत्तसेवा**

धुळे, ता. १३ : जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या हॉस्पिटलमध्ये ४० खाटांचे कोरोना विलगीकरण कक्ष सुरू करण्यात आला. महापालिका व जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटलच्या पुढाकाराने हा कक्ष स्थापन करण्यात आला. महापालिकेचे आयुक्त अजीज शेख यांच्या हस्ते या कक्षाचे आज उद्घाटन झाले.

‘कोरोना’चा सामना करण्यासाठी महापालिका व जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटलने खाटांचा कोरोना विलगीकरण फाउंडेशनच्या हॉस्पिटलमध्ये ४० कक्ष स्थापन केला. महापालिकेचे आयुक्त अजीज शेख यांच्या हस्ते या कक्षाचे आज उद्घाटन झाले.



**धुळे : जवाहर हॉस्पिटलमध्ये कोरोनाग्रस्त रुग्णांसाठी विलगीकरण कक्षाची पाहणी करताना आयुक्त अजीज शेख. शेजारी उपायुक्त गणेश गिरी, डॉ. ममता पाटील, संगीता पाटील, डॉ. महेश मोरे आदी.**

याप्रसंगी उपायुक्त गणेश गिरी, जवाहर मेडिकल फाउंडेशनचे चेअरमन डॉ. भाईदास पाटील, डॉ. ममता पाटील, सहसचिव संगीता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. महेश मोरे, उपप्राचार्या डॉ. आरती महाले, प्रा. डॉ. नितीन कुलकर्णी, प्रा. डॉ. शर्मा आदी उपस्थित होते. या उपक्रमासाठी निंबा मराठे, प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते, जनसंपर्क अधिकारी प्रवीण खरे आदींनी सहकार्य केले.

महाराष्ट्राचे हक्काचे स्वतंत्र वृत्तपत्र

दिव्य मराठी
# दिव्य सिटी

धुळे, शनिवार, १४ मार्च २०२० | फाल्गुन कृ.५, शके १९४१

## आजचे हवामान

| तापमान | कमाल | किमान |
|---|---|---|
| | ३०.६ | १०.२ |

अंदाज : कमाल तापमान वाढण्याची शक्यता.

सूर्यास्त आज सायं. ०६.४० | सूर्योदय उद्या प्रातः ६.३९

## चांगली बातमी

**अधिकारी, कर्मचारी आज उपस्थित राहणार**

## आज शहरात

**चित्रकला बक्षीस वितरण**
स्थळ : बालकृष्ण लॉन, शिवाजी रोड, वेळ - सायंकाळी ५ वाजता

**अंध विद्यार्थिनींचे संमेलन**
स्थळ : शिवसागर मंगल कार्यालय, वेळ - सकाळी ९ वा.

**महिलांसाठी स्पर्धा**
स्थळ : दिविक्षा मंगल कार्यालय, वेळ - दुपारी २.३० वाजता.

**ग. स. बँकेबाबी बैठक**
स्थळ : गुलमोहर विश्रामगृह, वेळ - दुपारी ३ वाजता.

**कोरोनाबाबत जनजागृती**
स्थळ : आयएमए विश्रामभवन, वेळ - सकाळी ८.३० वाजता.

**समता परिषद मेळावा**
स्थळ : आमदार गुरुजी ज्ये.ना.संघ, वेळ - सकाळी ९ वाजता.

## न्यूज ब्रीफ

**परीक्षा केंद्राजवळ फिरणाऱ्यांवर गुन्हा**

---

धसका कोरोनाचा • मनपा आयुक्तांनी केली पाहणी; नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन

# जवाहर मेडिकलमध्ये ४० बेडचा वॉर्ड सुरू; शाळांमध्येही जनजागृतीला वेग

**जनजागृती करण्यासाठी मनपा घेणार पुढाकार**

प्रतिनिधी | धुळे

### विद्यार्थ्यांमध्ये हात धुण्यासह स्वच्छता पाळणे व पालकांना संदेश देण्यावर भर



जवाहर मेडीकल कॉलेजमध्ये तयार केलेल्या विशेष कक्षाची पाहणी करताना आयुक्त शेख व मान्यवर.

**इटलीहून परतलेल्या तरुणीस आरामाचा सल्ला**

**कोरोनावर सध्यातरी या औषधांचा उपाय...**

**शाळांमध्येही केली जातेय जनजागृती ...**

---

# रंगभरा स्पर्धेचे आज होणार शहरात बक्षीस वितरण

**बालकृष्ण लॉनवर सायं.५ वाजता कार्यक्रम**

प्रतिनिधी | धुळे



---

## अप्सरा आली... गृहिणींचाही रंगला रॅम्पवॉक...



**इंदवे येथे घराबाहेर उभे राहून एकाने केला विवाहितेचा विनयभंग**

---

# अमरीश पटेलांना भाजपचा अन् अभिजित पाटलांना काँग्रेसचा अधिकृत एबी फार्म

**छाननीत सर्व १३ अर्ज वैध; माघारीकडे लक्ष**

प्रतिनिधी | धुळे

**माघारीनंतरच लढतीचे चित्र होईल स्पष्ट....**

**उमेदवारांचे प्रतिनिधी होते सभागृहात उपस्थित**

**धुळेसह नंदुरबारात राजकीय लढत ठरणार प्रतिष्ठेची**

---

# मृत ट्रकचालकावर गुन्हा; तिघांचे झाले शवविच्छेदन

---

करणी • महिला अत्याचार निवारण कक्षासमोरच झालेल्या प्रकारामुळे कर्मचाऱ्यांमध्येही भीतीचे वातावरण

# जिल्हा परिषदेत लिंबू, हळद- कुंकवाचा जादूटोणा

प्रतिनिधी | धुळे



**महिलांच्याच कक्षासमोर**

**गॅरेजवर दुरुस्तीसाठी आणलेला ट्रक पेटला**

---

# २२ लाखांची थकबाकी भरल्याने टळली कारवाई

**मनपा प्रशासनाने दिला होता कारवाईचा इशारा**

प्रतिनिधी | धुळे

# कोरोना : जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा लागू

- घाबरुन जाऊ नका, खबरदारी घ्या : जिल्हा प्रशासनाचे आवाहन
- हिरे महाविद्यालयात सहा खाटांसह चार व्हेंटीलेटरची सुविधा
- वैद्यकीय तज्ज्ञांसह अलगीकरण कक्ष स्थापन
- गर्दीच्या ठिकाणावरील सर्व कार्यक्रमांचे आयोजन टाळा
- टोल फ्री क्रमांक व हेल्पलाईन क्रमांक सुरु

**धुळे** : जिल्ह्यातील नागरिकांनी ‘कोरोना’ या आजाराला घाबरुन न जाता योग्य ती खबरदारी घ्यावी. कोणत्याही अफवांपासून दूर राहावे. जिल्हास्तरावर धुळे येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ६ खाटा (बेड), चार व्हेंटीलेटर व वैद्यकीय तज्ज्ञांसह सुसज्ज अलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आला असून प्रशासकीय उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे धुळे जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा लागू करण्यात आला आहे. नागरिकांनी शंका निरसनासाठी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी गंगाथरन डी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वान्मथी सी., जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शिवचंद्र सांगळे यांनी केले आहे.

चीनमध्ये कोरोना विषाणू आजाराचा उद्रेक सुरु झाला आहे. चीन व्यतिरिक्त अन्य ११८ देशांमध्ये या आजाराचे रुग्ण आढळून आले आहेत. या पार्श्वभूमीवर या आजाराचा प्रवेश भारतात होऊ नये म्हणून आंतरराष्ट्रीय विमानतळावर बाधित देशातून येणाऱ्या प्रवाशांचे स्क्रीनिंग तसेच या प्रवाशांना १४ दिवसांकरीता पाठपुरावा, लक्षणे आढळलेल्या प्रवाशांचे विलगीकरण आणि प्रयोगशाळा तपासणी आदी उपाययोजना करण्यात येत आहेत.

सद्यःस्थिततीत जगात जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार १,१८,३७४ कोरोना बाधित रुग्ण आढळले असून त्यापैकी ४,२९५ मृत्यूमुखी पडले आहेत. कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी धुळे जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा लागू करण्यात आला आहे. तसेच या विषाणूचे गांभीर्य पाहता शासनाचे पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत गर्दी होईल, असे शासकीय, खासगी आदी सर्व कार्यक्रमांचे आयोजन न करणे, जिल्ह्यातील सर्व स्विमींग पूल न वापरण्याचे आवाहन जिल्हाधिकारी गंगाथरन डी. यांनी केले आहे.

(पान ४ वर)

## नेदरलँडहून परतलेली व्यक्ती जिल्हा रुग्णालयात

**साक्री** : धुळे येथील मूळ रहिवासी असलेल्या व नेदरलँड देशातून भारतात परतलेल्या एका व्यक्तीला वैद्यकीय उपचारासाठी धुळे येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सदरची व्यक्ती साक्री शहरातील एका कॉलनीत आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी आली होती. मात्र, जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार सदर व्यक्तीची साक्री येथे वैद्यकीय तपासणी करण्यात येऊन धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अलगीकरण कक्षात पाठविण्यात आले आहे. याबाबत माहिती अशी की, धुळे येथील मूळ रहिवासी असलेली एक व्यक्ती नेदरलँड येथून भारतात परतली आहे. त्यानंतर ती व्यक्ती साक्री शहरातील एका कॉलनीत नातेवाईकांना भेटण्यासाठी आली होती. मात्र, व्यक्तीची वैद्यकीय तपासणी करुन धुळे येथे तपासणीसाठी पाठवावे, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी केले होते. त्यानुसार काल दि.१३ रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास ग्रामीण रुग्णालय प्रशासनाने तत्काळ त्या व्यक्तीसाठी १०८ रुग्णवाहिका पाठवून ग्रामीण रुग्णालयात आणले. यावेळी डॉक्टरांनी तपासणी करुन पुढील उपचारासाठी धुळे येथे पाठविले, अशी माहिती ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बी. पी. गोहिल यांनी दिली आहे. या व्यक्तीस ताप आणि घशाचा त्रास जाणवू लागल्याने येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. बी. पी. गोहिल, डॉ. विवेक जाधव आदींनी तपासणी करुन धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अलगीकरण कक्षात पाठविले आहे.

### मनपा आणि जवाहर मेडीकल फाउंडेशनतर्फे

## ४० बेडचा कोरोना वॉर्ड सुरु


(छाया : पुण्य)

**धुळे** : कोरोना व्हायरसचा सामना करण्यासाठी धुळे महापालिका आणि जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडीकल कॉलेज व हॉस्पीटलने पुढाकार घेतला असून ४० बेडचे कोरोना वॉर्ड महापालिका आयुक्त अजीज शेख यांच्या हस्ते सुरु करण्यात आले. यावेळी उपायुक्त गणेश गिरी, जवाहर मेडीकल

(पान ४ वर)

लोकमत

# धुळ्यात डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरचे ऑनलाईन लोकार्पण

## धुळ्यात चार नवीन सेंटर : ऑक्सिजनयुक्त खाटांची संख्या वाढली

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अर्थात डेडिकेटेड कोविड हॉस्पिटलमधील नवीन इमारतीत अतिदक्षता विभागातील ५५ व ६० ऑक्सिजनयुक्त बेड, शिरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयातील डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर येथील ऑक्सिजनयुक्त ५० बेड, अजमेरा आयुर्वेद महाविद्यालयातील कोविड हेल्थ सेंटर, जवाहर मेडिकल फाऊंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयातील १०० बेड ऑक्सिजनयुक्त कोविड हेल्थ सेंटरसह महिला व बालविकास भवनचा ऑनलाइन लोकार्पण सोहळा जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते पार पडला.

**जिल्हा रुग्णालयात उदघाटन**

जिल्हा सामान्य रुग्णालयात नव्याने उभारलेल्या आणि महानगरपालिका, धुळे संचलित डेडिकेटेड कोविड हॉस्पिटलमधील ऑक्सिजनयुक्त ६० बेडच्या कोविड हेल्थ केअर सेंटरचे उदघाटन पालकमंत्री सत्तार यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार कुणाल पाटील, आमदार मंजुळा गावित, जिल्हाधिकारी संजय यादव, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वान्मथ सी., पोलिस अधीक्षक पंडित, महानगरपालिका आयुक्त अजिजशेख, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. माणिक सांगळे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल पाटील आदी उपस्थित होते. पालकमंत्री सत्तार यांनी कोविड सेंटरची पाहणी करुन विविध सूचना केल्या. त्यानंतर पालकमंत्री सत्तार यांनी अजमेरा आयुर्वेद रुग्णालयातील कोविड हेल्थ केअर सेंटरला भेट देवून तेथील खासगी प्रयोगशाळेची पाहणी केली.

**जवाहर कोविड हेल्थ केअर सेंटरचे उदघाटन**

जवाहर मेडिकल फाऊंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालयात कोविड हेल्थ केअर सेंटरचे उदघाटन पालकमंत्री सत्तार यांच्या हस्ते करण्यात आले. या सेंटरमध्ये ऑक्सिजनयुक्त १०० बेड आहेत. यावेळी फाऊंडेशनचे चेअरमन डॉ. भाईदास पाटील, उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, माजी मंत्री रोहिदास पाटील, जिल्हाधिकारी यादव यांच्यासह वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री सत्तार यांनी कोविड सेंटरची पाहणी केली.



**जिल्ह्यातील कोवीड हेल्थ सेंटरचे ऑनलाईन लोकार्पण करताना पालकमंत्री, लोकप्रतिनिधी आणि जिल्हाधिकारी.**

## केशरानंद हॉस्पिटल कोरोनासाठी खुले

- केशरानंद मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटलचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते स्वातंत्र्यदिनी कोरोना रुग्णासाठी लोकार्पण करण्यात आले.
- केशरानंद उदयोग समुहाचे कार्यकारी संचालक ज्ञानेश्वर भामरे यांना कोरोनाची लागण झाली होती. त्यांना १५ दिवस मुंबई येथे उपचारार्थ रहावे लागले होते. रुग्णांना स्थनिक पातळीवर उपचार मिळावेत यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी संजय यादव यांच्याशी चर्चा करुन आपले हॉस्पीटल कोरोना रुग्णासाठी उपलब्ध करुन दिले.
- सुवीधेबाबत प्रास्ताविकास हॉस्पीटलचे प्रमुख डॉ. महेंद्र बोरसे यांनी माहीती दिली. ज्ञानेश्वर भामरे यांच्या या कार्याचे लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी कौतुक केले.
- यावेळी आमदार कुणाल पाटील, आमदार मंजुळा गावीत, पोली अधीक्षक चिन्मय पंडीत, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्याम सनेर, युवराज करनकाळ, राजेंद्र देसले, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख हिलाल माळी आदी उपस्थित होते.

# जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या योगदानाची इतिहासात नोंद होणार - पालकमंत्री अब्दुल सत्तार

## १०० बेडच्या डेडिकेटेड कोविड सेंटरचे उद्घाटन



**धुळे** - कोरोनाच्या वाढत्या प्रादूर्भावात हिरे मेडिकल कॉलेजचा संपूर्ण भार आपल्याकडे घेवून जवाहर मेडिकल फाउंडेशनने शासनाला सहकार्य केलेले आहे. परंतु केवळ सात दिवसात संपूर्ण सुविधांनी युक्त १०० बेडचे डेडिकेटेड कोविड सेंटर उभारून मोठे योगदान दिलेले आहे. जवाहर फाउंडेशनच्या या कार्याची इतिहासात नोंद होईल असे मत धुळे जिल्हयाचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी मांडले.

यावेळी माजी मंत्री रोहिदास पाटील, जवाहर मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.भाईदास पाटील, आमदार कुणाल पाटील, आमदार मंजुळा गावित, जिल्हाधिकारी संजय यादव, पोलिस अधिक्षक चिन्मय पंडीत, आयुक्त अजीज शेख, सीईओ वान्मती सी. अप्पर पोलिस अधिक्षक डॉ.राजू भुजबळ, उपायुक्त गणेश गिरी, उपायुक्त शांताराम गोसावी, जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या सहसचिव संगीता पाटील, ममता पाटील, अधिष्ठाता डॉ.विजय पाटील, उपअधिष्ठाता डॉ.आरती कर्णिक, डेंटल कॉलेजचे डिन डॉ.अरूण दोडामनी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख हिलाल माळी, माजी जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, धीरज पाटील, डॉ. तुळशीराम गावित आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी ना.अब्दुल सत्तार यांनी जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या कामाचे कौतुक करतानांच माजी मंत्री रोहिदास पाटील यांनी महाराष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला. श्री शिवाजी विद्या प्रसारक मंडळ तसेच जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून ते धुळे जिल्हयातील जनतेला सेवा देत असल्याने त्यांचा सार्थ अभिमान असल्याचे सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार कुणाल पाटील मागील दहा वर्षांपासून सभागृहात विविध प्रशनांवर आवाज उठवित असल्याचेही ते म्हणाले. पाण्यामुळे हॉस्पिटलकडे जाणारा रस्ता वाहून गेला या रस्त्यासाठी तातडीने ३८ लाख रूपयांच्या कामाला मंजुरी देण्यात आल्याचे ते म्हणाले. पुढील दोन महिन्यात हा रस्ता तयार करण्यात येईल असेही ते यावेळी म्हणाले. कोविड सेंटरचा परिसर अल्हाददायक असून याठिकाणच्या वातावरणामुळे रूग्ण तातडीने बरा होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. दरम्यान जिल्हाधिकारी संजय यादव, पोलिस अधिक्षक, सीईओ, महापालिका आयुक्त यांनी एकत्रित येवून उत्तमप्रकारे नियोजन केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पालकमंत्री तसेच अन्य मान्यवरांचा जवाहर मेडिकल फाउंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी माजी मंत्री रोहिदास पाटील, डॉ.भाईदास पाटील, आमदार कुणाल पाटील आदींनी मान्यवरांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

**हे कोविड सेंटर नरीमन पॉईंटवर असल्यासारखे वाटते**

जवाहर मेडिकल फाउंडेशनचे कोविड सेंटर पाहत असतांना खिडकीकडे गेल्यानंतर पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी नकाने तलावचा परिसर पाहिल्यानंतर हे कोविड सेंटर मुंबईच्या नरीमन पॉईंटवर असल्यासारखे वाटते. हा नजारा प्रचंड सुंदर असल्याचे ते म्हणाले. पर्यावरणाशी समरूप असलेले हे कोविड सेंटर निश्चितच आदर्शवत ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## 'महाराष्ट्र सोशल फोरम' या

## मराठा महासंघाच्या कार्यालयात

पुण्यनगरी

# डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी हेच खरे देवदूत !

## पोलीस अधीक्षक चिन्मय पंडित : जवाहर मेडिकल फौंडेशनच्या कोविड सेंटरला दिली भेट

**धुळे** : कोविडच्या कठीण काळात डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी हे रुग्णांना देत असलेली सेवा खरोखर कौतुकास्पद आहे. हे सर्व डॉक्टर्स खरे देवदूत आहेत, असे मत जिल्हा पोलीस अधीक्षक चिन्मय पंडित यांनी व्यक्त केले. जवाहर मेडिकल फौंडेशनच्या डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरला दिलेल्या भेटीत ते बोलत होते. यावेळी चिन्मय पंडित यांनी कोरोनाग्रस्त रुग्णांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. जवाहर मेडिकल फाऊंडेशन कोविड काळात करत असलेले काम हे अद्वितीय असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

पोलीस अधीक्षक चिन्मय पंडित यांनी जवाहर मेडिकल फाऊंडेशनच्या डिसीएचसी सेंटरला नुकतीच भेट दिली. याप्रसंगी डॉ. ममता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.



मागील दीड महिन्यांपासून जवाहर मेडिकल फाऊंडेशनने १ हजारांहून अधिक रुग्णांवर यशस्वीपणे उपचार केल्याची माहिती डॉ. ममता पाटील यांनी दिली. डॉ. विजय पाटील यांनीही कोविडच्या दुसऱ्या लाटेत एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल निस्वार्थपणे सेवा देत आहे. हॉस्पिटलमध्ये एकूण कोविडच्या रुग्णांसाठी २५० बेड उपलब्ध आहेत. आयसीयूत २५ हून अधिक रुग्णांवर उपचार सुरू आहेत अशी माहिती दिली. रुग्णसेवा करण्यासाठी जवाहर मेडिकल फाऊंडेशन कटिबद्ध असून उत्तमोत्तम सेवा देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही डॉ.पाटील यांनी सांगितले. दरम्यान, चिन्मय पंडित यांनी कोरोना वॉर्ड, विलगीकरण कक्षाला भेट देत रुग्णांना धीर दिला. कोविडशी लढण्यासाठी पोलीस प्रशासन आपल्या सोबत असल्याचे ते म्हणाले. आरोग्य कर्मचारी, डॉक्टर्स यांना सर्वोतोपरी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. डॉक्टर्स हे ईश्वराचे रूप असून त्यांच्या रूपाने ईश्वर तुमच्या कायम मदतीला असल्याचे ते म्हणाले. यावेळी रुग्णांनीही जवाहर मेडिकलविषयी चांगल्या भावना व्यक्त केल्या. उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच टीम उत्तम कार्य करीत असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. मधुकर पवार, डॉ. तुषार भट, डॉ. रोहन कुलकर्णी, प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते मान्यवर उपस्थित होते.

### कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप

पोलीस अधीक्षक चिन्मय पंडित यांनी स्वच्छता कर्मचारी विजय घारु यांची आवर्जून भेट घेत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. आयसीयूत काम करणारा अतुल जिरे यांच्या कामाचेही त्यांनी भरभरून कौतुक केले. या दोघांसमवेत त्यांनी आवर्जून फोटो काढला.

# करोना क्वारंटाईन वॉर्डला वान्मती सी. यांची भेट संसर्गित रुग्णांची काळजी घेण्याचे केले आवाहन

**धुळे ★ खान्देश खबर वृत्त ★**



राज्यात करोना विषाणू संसर्ग वेगाने पसरत असल्याच्या पार्श्वभूमीवर धुळे शहरातही आवश्यक ती सतर्कता बाळगण्यात येत आहे. करोनाशी लढा देण्यासाठी आवश्यक ती काळजी प्रशासनाकडून घेण्यात येत आहे. जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात तयार करण्यात आलेल्या करोना क्वारंटाईन वॉर्डची जिल्हा परिषदेच्या सीईओ वानमती सी. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शिवराम सांगळे यांनी अचानक भेट देत पाहणी केली.यावेळी योग्य ती माहिती त्यांनी जाणून घेतली. तब्बल ४४ खाटांचा वॉर्ड पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी आवश्यक ती सतर्कता आणि काळजी घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. संशयित रुग्ण आढळल्यास अथवा रुग्णालयात संशयितांच्या संसर्गात आलेल्या रुग्णांवर उपचार आणि देखरेख करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी जवाहर मेडिकल फाउंडेशन चे चेअरमन डॉ. भाईदास पाटील, व्हाईस चेअरमन तथा आमदार कुणाल पाटील, डॉ.ममता पाटील,सहसचिव संगीता पाटील रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, उपप्राचार्य डॉ. आरती महाले, निंबा मराठे यांच्यासह प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते जनसंपर्क अधिकारी प्रवीण खरे आदी उपस्थित होते. जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम रुग्णालयात तयार करण्यात आलेल्या सुविधांचे त्यांनी यावेळी कौतुक करत जिल्हा प्रशासन या वॉर्डसाठी सर्वोतोपरी मदत करेल असेही त्यांनी सांगितले.

# कोरोनाच्या प्रतिबंधासाठी आरोग्य यंत्रणेने सतर्क रहावे –आ.कुणाल पाटलांची सूचना

**धुळे ★ खान्देश खबर वृत्त ★**



देशात आणि राज्यात कोरोना विषाणूंचा विळखा दिवसेंदिवस वाढत असून खबरदारीचा उपाय म्हणून धुळे तालुक्यातील आणि जिल्हयातील आरोग्य यंत्रणेने जबाबदारीने जागृतपणे ग्रामीण व नागरी क्षेत्रात काम करावे, त्यासाठी ग्रामीण भागात गावागावात जावून नागरीकांमध्ये जनजागृती करुन आरोग्यसेवा द्यावी अशा सूचना आ.कुणाल पाटील यांनी आरोग्य विभागाला केल्या असून नागरीकांनी घाबरून न जाता स्वच्छतेबाबत दक्ष राहून स्वताच्या आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन आ.पाटील यांनी केले आहे.

आ.कुणाल पाटील यांनी सांगितले की, कोरोना या संसर्गजन्य आजाराचा प्रादूर्भाव वाढू लागला आहे. या आजारावर उपचारासाठी शासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. युध्दपातळीवर राज्यात आरोग्य यंत्रणा कार्यरत झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर धुळे ग्रामीणसह, शहरी आणि जिल्हयातील आरोग्य अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही सतर्क राहून काम करणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामीण भागात गावागावात, पाड्यापाड्यात जावून जनजागृती करावी, लोकांमध्ये जागृती निर्माण करुन कोणती काळजी घेतली गेली पाहिजे? यासाठी आरोग्य चळवळ राबविली गेली पाहिजे.

दरम्यान प्राथमिक उपचार म्हणून योग्य ती आरोग्य सेवा देत या आजाराची लागण होवून नये म्हणून आरोग्य कर्मचाऱ्यांनी काम करावे. ग्रामीण भागात जि.प.अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र आणि नगरपालिका क्षेत्रात नगरपालिकेचे दवाखाने येत असतात. येथील आरोग्य कर्मचाऱ्यांनी ही आरोग्य सेवा देणे आवश्यक आहे. जिल्हयात अद्याप कोरोनाचे रुग्ण आढळून येत नसले तरी भविष्यातील सतर्कता महत्वाची आहे. त्यासाठी भाऊसाहेब हिरे वैद्यकिय महाविद्यालयात सुसज्ज कोरोना अलगीकरण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच धुळे महानगरपालिका आणि जवाहर मेडीकल फौंडशनच्या आण्णासाहेब चुडामण पाटील वैद्यकिय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना अलगीकरण कक्ष स्थापन झाले आहे.जिल्हा आरोग्य विभागाच्या सूचनेनुसार नागरीकांनी घाबरुन न जाता स्वच्छतेबाबत जागृत राहून आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन आ.कुणाल पाटील यांनी केले आहे.

34% 7:26 AM



**धुळे : जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या हॉस्पिटलमधील कोरोना विलगीकरण कक्षाची पाहणी करताना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वान्मती सी. व मान्यवर.**

# कक्षाची 'सीईओं'कडून पाहणी

धुळे, ता. १६ : जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व रुग्णालयातील कोरोना विलगीकरण कक्षाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वान्मती सी. यांनी आज अचानक भेट दिली. कक्षाबाबत माहिती जाणून घेत संशयित रुग्ण आल्यास आवश्यक उपचार व दक्षता घेण्याचे आवाहन केले. एसीपीएम मेडिकल कॉलेजमध्ये ४४ खाटांचे कोरोना विलगीकरण कक्ष सुरू केला आहे. या कक्षाची सीईओ वान्मती सी., जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शिवराम सांगळे यांनी आज अचानक पाहणी केली. तब्बल ४४ खाटांचा वॉर्ड पाहून वान्मती सी. यांनी समाधान व्यक्त केले. संशयित रुग्ण, संशयितांच्या संसर्गात आलेल्या रुग्णांवर उपचार आणि देखरेख करण्याचे त्यांनी आवाहन केले. जवाहर मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, डॉ. ममता पाटील, सहसचिव संगीता पाटील, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, उपप्राचार्य डॉ. आरती महाले, निंबा मराठे, प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते, जनसंपर्क अधिकारी प्रवीण खरे आदी उपस्थित होते.


धुळे स्वतंत्र भारत Vision
दि. १४ मार्च २०२०
शनिवार

## महात्मा फुले-डॉ.आंबेडकर जयंतीला वाईकसह बैलगाडीची रॅली : रविकांत वाघ



## कोरोनाची दक्षता

### कोरोना विषाणू आहे काय?



### कोरोनाची लक्षणे

# 'कोरोना' : घाबरून न जाता योग्य खबरदारी बाळगावी!

■ धुळे जिल्हा प्रशासनाचे आवाहन, ■ धुळे जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा लागू

धुळे । प्रतिनिधी



### 'कोरोना' आजाराची प्रमुख लक्षणे

दैनिक आपलं नवराज्य
शनिवार १४ मार्च २०२०

# करोना विषाणूंशी लढा देण्यासाठी जवाहर मेडीकल फाउंडेशन सज्ज

धुळे – जगभरात करोना व्हायरसने धुमाकूळ घातला आहे. राज्यभरात करोना विषाणूंचा धोका वाढून करोनाग्रस्तांचे प्रमाण वाढत आहे. हा वाढता धोका ओळखून धुळयातही करोना व्हायरसचा सामना करण्यासाठी धुळे महापालिका आणि जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हास्पीटलने पुढाकार घेतला आहे. याठिकाणी तब्बल ४० बेडच्या करोना वॉर्डचे आज महापालिका आयुक्त अजीज शेख यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी उपायुक्त गणेश गिरी, जवाहर मेडिकल फाउंडशेनचे चेअरमन डॉ. भाईदास पाटील, व्हाईस चेअरमन आमदार कुणाल पाटील, सहसचिव संगीता पाटील, डॉ. ममता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, महापालिकेचे आरोग्य



अधिकारी डॉ. महेश मोरे, उपप्राचार्य डॉ. आरती महाले, प्रा. डॉ. नितीन कुलकर्णी, प्रा. डॉ. शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते.

आतापर्यंत करोना व्हायरसमुळे जगभरात ४ हजारपेक्षा जास्त लोकांना जीव गमवावा लागला आहे. तर जगात १ लाखांहून अधिक लोकांना करोनाची लागण झालेली आहे. भारतातही ७० पेक्षा अधिक जणांना करोनाची लागण झाली असून महाराष्ट्रांतही करोना रूग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबई, पुणे, यवतमाळ, नाशिक, नगर आदी भागात रोजच करोना संशयित आढळत आहेत. धुळयातही करोना संशयितांचे नमुने पुणे येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. धुळे येथे करोनाग्रस्तांसाठी विशेष व्यवस्था असावी म्हणून धुळे महापालिका आणि जवाहर मेडिकल फाउंडेशनचे एसीपीएम मेडिकल कॉलेज आणि रुग्णालय यांनी पुढाकार घेतला आहे. तब्बल ४० खाटांच्या करोना वॉर्डचे आज मान्यवरांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी आयुक्त शेख यांनी करोनाशी सामना करण्यासाठी शासन तयार असून योग्य ते आवश्यक उपाय करण्यात येत आहे. नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले असून आवश्यक त्या सूचनाही करण्यात येत आहे. करोनाबाबत जनजागृती करण्यासाठी शासन पुढाकार घेत असून जवाहर मेडिकल फाउंडेशनही या कामात हातभार लावला आहे. याठिकाणी आज ४० बेडच्या करोना वॉर्डचे उदघाटन करण्यात आले असून शासनाचे पूर्ण सहकार्य एसीपीएम मेडिकल कॉलेज आणि हॉस्पीटलला असणार आहे. जवाहर मेडिकल फाउंडेशनला सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले.या उपक्रमासाठी निंबा मराठे, प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते,

# कोविड, म्युकरमायकोसीस, हॅपीटायटीस बी रुग्णाला जवाहर फाउंडेशनच्या डॉक्टर्स टिमने दिले 'जीवदान'



**धुळे** - कोरोनाच्या पहिल्या लाटेपेक्षा दुसरी लाट ही तीव्र आहे. या लाटेनंतर पोस्ट कोविड रूग्णांमध्ये म्युकरमायकोसिस हा भयंकर आजार वेगाने पसरू लागला. अशाच आजारात नांदर्डे ता. शिरपूर येथील किरणसिंग पावरा वय ३५ तीव्र आजारी पडला. त्यास कोविड, पोस्ट कोविड, म्युकरमायकोसिस, हॅपीटायटीस बी आजार होते. त्याची घरची परिस्थितीही जेमतेम. या गरीब रूग्णांवर धुळ्याच्या जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या डॉक्टरांनी जोखीम पत्करत शस्त्रक्रिया केली. ती यशस्वी होवून रूग्णास जीवदान मिळाले आहे.

शिरपूर तालुक्यातील नांदर्डे येथील किरणसिंग पावरा याला काही दिवसांपूर्वी कोरोना झाला होता. त्यातून तो काहीअंशी बरा झाल्यानंतर त्याच्यात काही दिवसांनी म्युकरमायकोसिसची लक्षणे जाणवू लागली. त्यामुळे तो उपचारासाठी जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये असलेल्या म्युकरमायकोसिस वॉर्डात दाखल झाला. त्याठिकाणी त्यावर उपचार सुरू झाले. प्राथमिक तपासणीत पावरा हॅपिटायसिटस बी पाझिटिव्ह आढळून आला. त्याद्वारे कोविडचा संसर्गासह अन्य धोके, मोठ्या प्रमाणात संसर्ग होणार, हे माहित असताना डेंटल कॉलेजच्या ओरल मॅक्सिलोफेशियल सर्जरीचे विभागप्रमुख डॉ. बी.एम.रूडगी यांनी पावरा याच्यावर तत्काळ शस्त्रक्रिया करण्याचा धाडसी निर्णय घेतला. भूलतज्ञ डॉ. मनोजकुमार कोल्हे यांच्या सहकार्याने रूग्णांला भूल देण्यात आली. डॉक्टरांच्या सर्व टिमच्या सहकार्याने रूग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आली.

शस्त्रक्रियेसाठी माजीमंत्री रोहिदास पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, डॉ. ममता पाटील, सहसचिव संगीता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, डेंटल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ.अरूण दोडामनी, वैद्यकीय अधीक्षक डॉ.मधुकर पवार यांचे मार्गदर्शन लाभले. शस्त्रक्रियेयासाठी डॉ. श्रीराम, डॉ. विनायक, डॉ.प्राची यांनी सहकार्य केले.

पुण्य नगरी

# कोविड, पोस्ट कोविड रूग्णांसाठी फिजिओथेरेपी ठरतेय लाभकारक

**धुळे** : कोविड, पोस्ट कोविड रुग्णांसाठी फिजिओथेरेपी शंभर टक्के लाभकारक ठरत असल्याचा दावा जवाहन मेडिकल फाउंडेशनने केला आहे. कोरोना विषाणू मुख्यत्वे करून श्वसन प्रणालीवर आघात करत असल्याने फुप्फुसाची कार्यक्षमता कमी होते. यासाठी व्यायायामाच्या माध्यमातून फुप्फुस व श्वासाचे स्नायू बळकट करणे अत्यंत महत्वाचे आहे. एआरडीएस श्वसनसंस्थेशी निगडीत आजार व न्यूमोनियामध्ये फुप्फुसांमध्ये पाणी किंवा पस भरते. त्यामुळे रूगणांना श्वास घेतांना त्रास होतो. कधीकधी अशक्तपणाही जाणवतो हा आजार बळावल्यास फुप्फुसांचा फायब्रॉसिस होण्याचा धोका संभवतो. जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये फिजिओथेरेपी केंद्र कार्यान्वित केले आहे. कोविड झालेल्या २०० पेक्षा जास्त रूग्णांना फुप्फुसाच्या फिजिओथेरेपीचा लाभ देण्यात आला. फिजिओथेरपी उपचारांमध्ये प्रामुख्याने विश्रांती तंत्र, पर्सड लिप म्हणजेच श्वसन क्रिया-ओठ दुमडून श्वसनक्रिया, वक्षीय विस्तार, छातीचे हालचाल वाढवणारे व्यायाम, वायुवीजन करणाऱ्या स्नायूंचे प्रशिक्षण, ओटीपोटापासून श्वसनक्रिया, शरीर विशिष्ट स्थितीत ठेवून बेडके स्त्रावांचा निचरा करणे, श्वसन सामान्य ठेवत रूग्णांची हालचाल वाढविणे याचा समावेश आहे.

स्पायरोमीटर वापरामुळे जंतुसंसर्गापासून होणाऱ्या फुप्फुसाचे आकुंचनास प्रतिबंध करता येते. शिवाय स्त्राव बाहेर काढण्यास मदत होवून फुप्फुसाची क्षमता वाढवते. त्यामुळे रूग्णांची ऑक्सिजन पातळीही वाढते. अधिक माहितीसाठी फिजिओथेरपी विभागप्रमुख डॉ. हर्षदा पाठक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकमत

# उत्तम आहार, दैनंदिन व्यायाम हिच जीवनाची गुरुकिल्ली

## एसीपीएम : महाविद्यालयात मानसिक आरोग्य दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** गेल्या सहा महिन्यांपासून कोरोना नावाच संकट आपले हातपाय पसरत असताना जगाचा वेग मंदावला. सामाजिक संपर्क तुटला. याकाळातच मानसिक आरोग्याशी निगडित आनेक रुग्ण समोर आले. या अनिश्चिततेच्या काळात धैर्याने लढा दिला आणि अजूनही हा कोरोनाविरुद्धचा लढा यशस्वीपणे सुरूच आहे. त्यामुळे या कोरोनाच्या काळात स्वतःची वैयक्तिक काळजी घ्यायला हवी,जे घडतंय ते सकारात्मकरित्या स्वीकारता



आलं पाहिजे असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसोपचारतज्ञ डॉ.तुषार भट यांनी केले.

जवाहर मेडीकल फाऊंडेशनच्या एसीपीएम वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.भट यांनी उपस्थित महाविद्यालयाचे विद्यार्थी, विभागप्रमुख, निवासी वैद्यकीय अधिकारी यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.विजय पाटील यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, कोरोनाचा हा काळ कठीण आहे. या काळात वाचनावर भर देत सोशल मिडीयाच्या माध्यमातून योगा व मेडीटेशन करून मानसिक आरोग्य राखलं तसेच आपलं आरोग्य हे आपल्या मानसिक आरोग्यावर अवलंबून आहे.

# म्युकरमायकोसिसमधून युवकास दिले जीवदान

**प्रतिनीधी** | शिरपूर

तालुक्यातील नांदर्डे येथील किरणसिंग पावरा (वय ३५) याला म्युकरमायकोसिस, हॅपिटायटिस बी असे आजार झाले. धुळे येथील जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या डॉक्टरांनी जोखीम पत्करत त्याची शस्त्रक्रिया केली. ती यशस्वी होऊन त्यास जीवदान मिळाले आहे.

किरणसिंग पावरा कोरोनातून बरा झाल्यावर त्यास म्युकरमायकोसिसची लक्षणे जाणवू लागली. त्यामुळे तो उपचारासाठी जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये असलेल्या म्युकरमायकोसिस वॉर्डात दाखल झाला. तसेच तो 'हॅपिटायटिस बी' पॉझिटिव्ह आढळून आला. या विषाणूमुळे यकृतावर परिणाम होतो. तसेच या विषाणूचा संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते. या रूग्णाद्वारे कोविडचा संसर्ग अन्य धोके, मोठ्या प्रमाणात संसर्ग होणार हे माहित असताना डेंटल कॉलेजच्या ओरल मॅक्सिलोफेशियल सर्जरीचे विभागप्रमुख डॉ. बी. एम. रूडगी यांनी त्याच्यावर तात्काळ शस्त्रक्रिया करण्याचा धाडसी निर्णय घेतला. भूलतज्ञ डॉ. मनोजकुमार कोल्हे यांच्या सहकार्याने भूल देण्यात आली. डॉक्टरांच्या टीमच्या सहकार्याने या रुग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आली. सदर शस्त्रक्रियेयासाठी डॉ. श्रीराम, डॉ. विनायक, डॉ. प्राची यांनी सहकार्य केले.

# करोनाच्या प्रतिबंधासाठी आरोग्य यंत्रणेने सतर्क रहावे : आ.कुणाल पाटलांची सूचना



**धुळे,● दै.मर्डर न्यूज ●**

देशात आणि राज्यात कोरोना विषाणूचा विळखा दिवसेंदिवस वाढत असून खबरदारीचा उपाय म्हणून धुळे तालुक्यातील आणि जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेने जबाबदारीने जागृतपणे ग्रामीण व नागरी क्षेत्रात काम करावे, त्यासाठी ग्रामीण भागात गावागावात जावून नागरीकांमध्ये जनजागृती करुन आरोग्यसेवा द्यावी अशा सूचना आ.कुणाल पाटील यांनी आरोग्य विभागाला केल्या असून नागरीकांनी घाबरुन न जाता स्वच्छतेबाबत दक्ष राहून स्वताच्या आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन आ.पाटील यांनी केले आहे.

आ.कुणाल पाटील यांनी सांगितले की, कोरोना या संसर्गजन्य आजाराचा प्रादूर्भाव वाढू लागला आहे. या आजारावर उपचारासाठी शासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. युध्दपातळीवर राज्यात आरोग्य यंत्रणा कार्यरत झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर धुळे ग्रामीणसह, शहरी आणि जिल्ह्यातील आरोग्य अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही सतर्क राहून काम करणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामीण भागात गावागावात, पाड्यापाड्यात जावून जनजागृती करावी, लोकांमध्ये जागृती निर्माण करुन कोणती काळजी घेतली गेली पाहिजे? यासाठी आरोग्य चळवळ राबविली गेली पाहिजे.

दरम्यान प्राथमिक उपचार म्हणून योग्य ती आरोग्य सेवा देत या आजाराची लागण होवून नये म्हणून आरोग्य कर्मचाऱ्यांनी काम करावे. ग्रामीण भागात जि.प.अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र आणि नगरपालिका क्षेत्रात नगरपालिकेचे दवाखाने येत असतात. येथील आरोग्य कर्मचाऱ्यांनी ही आरोग्य सेवा देणे आवश्यक आहे. जिल्ह्यात अद्याप कोरोनाचे रुग्ण आढळून येत नसले तरी भविष्यातील सतर्कता महत्वाची आहे. त्यासाठी भाऊसाहेब हिरे वैद्यकिय महाविद्यालयात सुसज्ज कोरोना अलगीकरण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच धुळे महानगरपालिका आणि जवाहर मेडीकल फौंडेशनच्या अण्णासाहेब चुडामण पाटील वैद्यकिय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना अलगीकरण कक्ष स्थापन झाले आहे. जिल्हा आरोग्य विभागाच्या सूचनेनुसार नागरीकांनी घाबरुन न जाता स्वच्छतेबाबत जागृत राहून आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन आ.कुणाल पाटील यांनी केले आहे.



**सिंदखेडा :** नर्सरी संघटनेच्या अध्यक्षा आशा ट्रेनर सौ.कल्पना देशपांडे यांना महिला दिनानिमित्त नाशिक पत्रकार संघातर्फे मान्यवरांच्या हस्ते सावित्री गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

# सतत गैरहजर रहाणाऱ्या तलाठ्याची बदली करा जि.प.सदस्य भरत पाटलांसह सरपंचांची तक्रार



**शिरपूर,● दै.मर्डर न्यूज ●**

तालुक्यातील उपरपिंडे तलाठी हे कर्तव्यावर हजर रहात नसल्याने शेतकऱ्यांसह ग्रामस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शेतकऱ्यांचे मागील वर्षी अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मात्र अद्याप यातील ४० ते ५० शेतकऱ्यांच्या पीकाचा पंचनामा अद्याप झालेला नाही. यासंदर्भात तलाठी यांना ग्रामस्थांनी वेळोवेळी अवगत करुन देखील ते कार्यालयात गैरहजर रहातात. त्यामुळे या तलाठ्याची बदली करण्यात यावी, अशी मागणी जि.प.सदस्य भरत पाटील यांच्यासह उपरपिंड सरपंच तसेच ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, शिरपूर यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तलाठी डी.सी.निंबाळकर हे गिधाडे सजेत नव्याने बदली होऊन रूजू झाले आहेत. उपरपिंड हे गाव गिधाडे तलाठी कार्यालयाच्या कक्षेत येते. मात्र तलाठी निंबाळकर हे उपरपिंड येथील कार्यालयात सतत गैरहजर रहात असल्याने ग्रामस्थांसह शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागील वर्षी ज्या ४० ते ५० शेतकऱ्यांच्या पीकाचा पंचनामा अद्याप झालेला नाही त्या शेतकऱ्यांवर शासन दरबारी आवश्यक ती कागदपत्रे देऊन देखील उपासमारीची वेळ आली आहे. आजपर्यंत त्यांच्याकडे कुठलीही शासकीय मदत मिळालेली नाही. यासंदर्भात वारंवार निंबाळकर यांना अवगत करुनही ते सतत गैरहजर रहात आहेत. त्यामुळे त्यांची बदली करण्यात यावी, अशी मागणी उपरपिंड सरपंचासह जि.प.सदस्य भरत पाटील, वसंत भदील, अननसिंग दौलत, योगेश पाटील, भाऊसाहेब कोळी, संदीप ठाकरे, गोपीचंद पाटील, भिकेसिंग पीलतसिंग राजपूत, वेडूसिंग गिरासे, राजेंद्र पाटील, गिंबा पाटील, नागराज पाटील, प्रविण राजपूत, दिपक राजपूत, अमोल पाटील, शुभम पाटील, उदयभान पाटील, ज्ञानेश्वर केवलसिंग राजपूत, दिपक पाटील, के.व्ही.राजपूत आदींनी केली आहे.

# एसीपीएम मेडिकल कॉलेजच्या शिबिरात ७० स्त्रियांची आरोग्य व काच तपासणी



**धुळे,● दै.मर्डर न्यूज ●**

जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेजमध्ये महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. भाईदास पाटील होते. सुरुवातीला मुलींची रेखाटन स्पर्धा घेण्यात आली. शिंजिनी पात्रा हिने या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवले. तर कुमारी वैभवी बेडेकर हिने द्वितीय पारितोषिक पटकावले.

महिला दिनी सर्व महिला कर्मचारी तसेच विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. त्यासाठी स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ.अलका पाटील यांनी किशोरवयीन मुलींचे आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. तर प्राध्यापक डॉ.नितीन कुलकर्णी यांनी महिलांचे आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. कु. वैभवी बेडेकर, कु. शर्वरी कुमारी नेहा या विद्यार्थी विद्यार्थिनी सुद्धा मनोगत मांडले. उपस्थित सर्व पुरुष डॉक्टर कर्मचारी व विद्यार्थी यांनी स्त्री संरक्षण व स्त्री आत्मसन्मानाची शपथ घेतली.

कार्यक्रमात डेंटल कॉलेजच्या डॉ. गिरीजा दोडामणी व इतर शिक्षक वृंद उपस्थित होते. कॉलेजच्या प्राचार्य कल्पना बोरसे, उपप्राचार्य शर्मा आणि यावेळी उपस्थित होते. प्रशासन विभागाचे ऍड. राकेश काकुस्ते डॉक्टर, डॉ. विजयकुमार चौरसिया यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचा समारोप कर्करोग निदान शिबिराने झाला.

या शिबिराचे उद्घाटन डॉ. ममता पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी सहसचिव संगीता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, डॉ.आरती महाले, मॅडम या मान्यवरांची उपस्थिती होती. या शिबिरात ७० स्त्रियांची आरोग्य तपासणी व काच तपासणी करण्यात आली. स्त्रियांना करोना विषयक मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी डॉक्टर अलका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक डॉक्टर नितीन कुलकर्णी, सहाय्यक प्राध्यापक डॉक्टर अमोल सोनवणे आदींनी परिश्रम घेतले. डॉ. नंदकुमार द्रविड यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन डॉक्टर भाईदास पाटील, व्हाईस चेअरमन डॉ. कुणाल पाटील, सहसचिव संगीता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, डेंटल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अरुण दोडमनी तसेच व सहाय्यक डॉक्टर आदींचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

**अर्जंट वेल्डर पाहिजेत**
शेड/फेब्रिकेशन वेल्डिंग जॉबवर्कच्या कामासाठी अर्जंट कारागीर पाहिजेत.
वेल्डर (कारागीर)
एकूण = ५ जागा
(आकर्षक पगार)
संपर्क
७७७४०८५५९१

**रायसोनी टायर हाऊस**
कॉम्प्युटराईज्ड व्हिल अलाईनमेंट ॲण्ड बॅलेंसींग सेंटर
apollo BRIDGESTONE GOODYEAR CEAT JK TYRE
मो. 9225130145, 8208138345, 02562-239113
पत्ता : आरटीओ ऑफिस जवळ, मुंबई-आग्रा रोड, धुळे

**प्लॉट विकणे आहे!**
धुळे शहरातील रमेश नगरला लागून चितोड येथील सर्वे नं.१५/१ येथील प्लॉट विकणे आहे.
.......संपर्क.......
मो.नं.९४२२२९६१५२

**मुले पाहिजेत**
पार्सल उतरविण्यासाठी तसेच पाठविण्यासाठी मुले पाहिजे.
रात्री ८ ते सकाळी ८ वाजेपर्यंत (शिक्षणाची अट नाही)
**श्रीनाथ ट्रॅव्हल्स**
झाशीराणी चौक, धुळे फोन : २२९१६६, २२९१६८
मो. ८२७५३२०८६१

**पाहिजेत**
१) क्लर्क १ जागा
२) ड्रायव्हर १ (फोरव्हीलसाठी)
४०७ व आयशर गाडी चालविण्यासाठी अनुभवी
टीप : साक्री येथील रहिवासी असल्यास प्राधान्य.
पत्ता : गुरुदत्त ऑईल मील, देवनगर साक्री, जि. धुळे,
९४२३११७७७२

**2 BHK चा प्लॉट विकणे आहे!**
2 BHK चा प्रशस्त सर्व सोयीयुक्त प्लॉट विकणे आहे.
सुवर्ण संधी
१०० % होम लोन मिळेल फक्त खरेदीचा खर्च करा आणि प्लॉटचे मालक व्हा.
पत्ता :-सिनेटेल शाळेजवळ, विजयीनगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे
संपर्क :- महेंद्र ढाके
मो.९५११६४५१६८
९८४४३२९५९३

**NANAK CAR**
कार रबींग पॉलीश.....१८००/-रुपये
कार कोटींग........२५०० ते ४०००/-रुपये
अंडरबॉडी कोटींग..... २२००/-रुपये
आपल्या गाडीचे छत, डॅश बोर्ड, दरवाजे, सिट कव्हर साफ करुन मिळेल. स्वच्छ कार, निरोगी कार, वायरसमुक्त कार...!
ऑईल बदली आता मोफत
आता आपली जुनी कारही दिसेल शोरूममधील चकचकीत कार प्रमाणे...!
मोफत ऑईल बदलीसह वॉशींग
.........आमचा पत्ता.........
८० फूटी रोड, रेम्बो सायकलमागे धुळे, मो.८६९८७०९३५९

हॉटेल गितांजली
गोंधळी
व्हेज/पंजाबी डिशेस
बैंगन मसाला ४० राईस
पटकी मसाला ४० जिरा राईस हाफ ३५
नॉन व्हेज स्टार्टर
मटण लटपटा ८० चिकन लटपट ६०
मटण मसाला हाफ ८० मच्छी करी हाफ ८०

## जवाहर फाउंडेशनच्या एसीपीएम रुग्णालयात

# २ मिनिटांत होणार बायोकेमिस्ट्री टेस्ट



■ **धुळे । दि.२७ । प्रतिनिधी**

जवाहर मेडिकल फाऊंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात ऑटोमॅटिक बायोकेमिस्ट्री अनालायझर मशीन बसविण्यात आले. त्यामुळे अवघ्या दोन मिनिटात बायोकेमेस्ट्री टेस्ट करणे शक्य झाले आहे.

पूर्वी कोणत्याही बायोकेमिस्ट्री टेस्टसाठी दहा ते पंधरा मिनिटांचा कालावधी लागत होता. परंतु आता या चाचण्या केवळ दोन ते चार मिनिटात करणे शक्य होणार आहे. या नवीन मशीनमुळे कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त पेशंटची बायोकेमेस्ट्री टेस्ट करणे सुलभ होणार आहे.

बायोकेमिस्ट्री टेस्टमध्ये बिलीरुबिन, शुगर, युरिया आदी २९ ते ३० प्रकारच्या विविध टेस्ट एकाचवेळी या मशीनमध्ये करणे शक्य होणार आहे. फुल्ली ऑटोमॅटिक बायोकेमिस्ट्री अनालायझर मशीनसोबतच रुग्णालयात श्री पार्ट अनालायझर मशीन बसविण्यात आले. रक्तातील हिमोग्लोबिन, एमसीआयटी, एमसीबी, अनिमिया यांच्यासह रक्तातील कोणताही दोष या मशीनमुळे अवघ्या दोन मिनिटात शोधणे शक्य होणार आहे.

रुग्णालयातील अत्याधुनिक लॅबमध्ये या दोन्ही मशीनचे उद्घाटन जवाहर मेडिकल फाऊंडेशनचे चेअरमन भाईदास पाटील, पुष्पाताई पाटील, ममताताई पाटील, रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.विजय पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. आरती कर्णिक, डॉ.राहुल घोणे, डॉ.नंदकुमार द्रविड, डॉ.आर. व्ही.पाटील, डॉ.अरुंधती गद्रे, डॉ.राहुल वाडिले, डॉ.ए.डब्ल्यू. पाटील, डॉ.इलान, डॉ.राहुल शिंदे, शरद पाटील, पीआरओ राकेश काकुस्ते आदी उपस्थित होते. या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन रुग्णालयातर्फे करण्यात आले आहे.

Acne Clear Cream
Since 1954
Best Skincare Partner
आपण आपल्या
कारण अशा

## महापालिकेतर्फे

## चितोड गावात कार जाळली

# कोविड रुग्णांसाठी फिजीओथेरेपी लाभदायक

## एसीपीएम मेडीकल कॉलेजमध्ये पोस्ट कोविड उपचार सुरु

देशोन्नती वृत्तसंकलन...

**धुळे** n कोरोना विषाणू मुख्यत्वेकरून श्वसनप्रणालीवर आघात करत असल्याने फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी होते. यासाठी व्यायायामाच्या माध्यमातून फुफ्फुस व श्वासाचे स्नायू बळकट करणे अत्यंत महत्वाचे आहे. ए आर डी एस श्वसनसंस्थेशी निगडीत आजार व न्यूमोनियामध्ये फुफ्फुसांमध्ये पाणी किंवा पस भरते. त्यामुळे रूगणांना श्वास घेतांना त्रास होतो. कधीकधी अशक्तपणाही जाणवतो हा आजार बळावल्यास फुफ्फुसांचा फायब्रॉसिस होण्याचा धोका संभवतो.

जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलने कोविडच्या पहिल्या लाटेत युध्द पातळीवर कोविड सेंटर उभारत शेकडो रूग्णांना जीवदान दिले. कोविडच्या दुस-या लाटेत सुमारे दिड हजारांहून अधिक रूग्णांना सेवा प्रदान केली. कोरोना महामारीत सर्वत्र कोविड पॉझिटिव्ह रूग्णांची संख्या झपाटयाने वाढली. त्यामुळे रूग्णांच्या उपचारांमध्ये फिजिओथेरेपीचे महत्व अधोरेखीत झाले. त्यामुळे जवाहरच्या प्रशासनाने कोविड रूग्णांना उपचारांत फिजिओथेरेपीचा समावेश



केला. कोविड झालेल्या २०० पेक्षा जास्त रूग्णांना फुफ्फुसाच्या फिजिओथेरेपीचा लाभ देण्यात आला. या थेरेपीमुळे रूग्णांच्या फुफ्फुसाची कार्यक्षमता वाढून रूग्ण झपाटयाने बरे होत असल्याचे लक्षात आले. खान्देशात फिजिओथेरेपी केंद्रांची संख्या जेमतेम आहे. त्यापैकी जवाहर मेडिकल फाउंडेशनचे फिजिओथेरेपी केंद्र वैशिष्टयपूर्ण आहे. २००२ सालापासून सर्व सुविधांनी युक्त असे हे केंद्र सुरू आहे. या केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत हजारो रूगणांना झाला आहे. सामान्यतः मानदुखी, पाठदुखी, संधीवात, पक्षाघात, चेह-याचा पक्षाघात, फ्रॅक्चर, मज्जातंतू, दुखापत, खेळताना होणा-या दुखापती अशा कित्येक आजारातून रूग्णांना बरे करण्यात या फिजिओथेरेपी केंद्राला यश आले आहे.

दरम्यान फुफ्फुसांची फिजिओथेरपी कोविड पॉझिटिव्ह व कोविड झाल्यानंतरही दिली जावू शकते. ऑक्सिजन पातळी ९० टक्क्यांच्या खाली असणा-या रूग्णांमध्ये आवश्यक ठरते. कोरोना संसर्गाची लक्षणे सौम्य, मध्यम व तीव्र असतात. त्यात सौम्य व मध्यम लक्षणे असणा-या रूग्णांमध्ये फिजिओथेरेपीचे अत्यंत चांगले परिणाम दिसून येत आहेत.

फुफ्फुसाच्या फिजिओथेरपीचे उददीष्टे, रूग्णांची शवासनलिका खुली ठेवणे, फुफ्फुसांची श्वास घेण्याची क्षमता वाढविणे, त्यातली बेडके स्त्राव बाहेर काढण्यासाठी, श्वासांच्या स्नायूंची ताकद वाढविण्यासाठी, दम/धाप लागणा-या रूग्णांमध्ये श्वासाची गती सामान्य करण्यासाठी, छातीची हालचाल सामान्य ठेवण्यासाठी, फुफ्फुसांचे वायूवीजन आणि वायुविनिमय सुधारण्यासाठी, शरीराची मुख्यतः पाठीची अनैसर्गिक ठेवण किंवा वाक सुधारण्यासाठी फुफ्फुसांच्या फिजिओथेरपी उपचारांमध्ये प्रामुख्याने खालील व्यायामांचा समावेश असतो.

# म्युकरमायकोसिसच्या रुग्णांना जवाहर फाउंडेशनचा आधार



**धुळे** : कोरोनासारख्या आजाराने रुग्ण हैराण झालेले असतांनाच दुसरीकडे म्युकरमायकोसिस या आजाराचे जीवघेणे संकट रुग्णांसमोर उभे राहीले आहे. अशा रुग्णांना अधार देण्यासाठी आता आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने जवाहर मेडीकल फौंडेशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल १०० खाटांचे अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आले असून या ठिकाणी दिवसरात्र तज्ञ डॉक्टर म्युकरमायकोसिसच्या रुग्णांवर उपचार करणार आहेत. दरम्यान उत्तर महाराष्ट्रात १०० खाटांचे वार्ड सुरु करणारे म्युकरमायकोसिसवर उपचार करणारे जवाहर मेडीकल हे पहिले हॉस्पिटल ठरले असून यामुळे रुग्णांना आधार मिळाला आहे.

कोरोना आजार झाल्यानंतर रुग्णांना म्युकरमायकोसिस या आजाराचे लक्षणे जाणवू लागतात. कोरोना आजारावर उपचारानंतर बरे झालेल्या रुग्णांना म्युकरमायकोसिस या जीवघेण्या आजाराची लागण होत आहे. या आजाराचे प्रमाण जिल्ह्यात आढळुन आले आहेत. नाकातला श्वास कोंडणे, काळ्या बुरशीचा चट्टा नाक, टाळू येथे आढळणे, डोळा दुखणे, सुजणे दृष्टी कमजोर होणे अशी लक्षणे आढळून येतात. तत्काळ उपचार झाल्यास रुग्ण बरा होतो.अन्यथा डोळा गमवावा लागतो तर काहींचा मृत्यूही ओढवला जातो. अशा रुग्णांना धुळे शहरात उपचार मिळावेत आणि त्यांना आधार मिळावा म्हणून जवाहर मेडीकल फौंडेशनचे चेअरमन डॉ.भाईदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकारातून व डॉ.ममता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जवाहर मेडीकल फौंडेशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने जवाहर मेडीकल येथे म्युकर मायकोसिसवर उपचार करणारे १०० खाटांचे अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आले. आ. कुणाल पाटील यांच्या हस्ते या उपचार केंद्राला सुरुवात करण्यात आली. यावेळी आ.कुणाल पाटील म्हणाले, मागील वर्षी कोरोना आजार आल्यानंतर रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत म्हणून जवाहर मेडीकलने पुढाकार घेवून १०० खाटांचे वार्ड सुरु केले होते. त्यानंतर यावर्षी कोरोनाचे रुग्ण वाढल्याने उपचारासाठी खाटांचीही संख्या वाढविण्यात आली. त्यामुळे शेकडो रुग्णांना जीवनदान देण्यात जवाहर मेडीकल यशस्वी ठरले आहे. कोरोनानंतर म्युकरमायकोसिस आजाराने रुग्ण हैराण झाले आहेत. अशा रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत म्हणून उत्तर महाराष्ट्रात पहिले म्युकरमायकोसिसवर उपचारासाठी १०० खाटांचे वार्ड सुरु केले आहे. म्युकरमायकोसिसवर आजाराच्या निदानासाठी तज्ञ डॉक्टरांचे पथक उपचार करणार आहे या केंद्राच्या उद्घाटनानंतर स्वता आ. कुणाल पाटील यांनी त्या वार्डमध्ये जाऊन रुग्णांची विचारपुस केली. त्यामुळे रुग्णांना दिलासा मिळाला. यावेळी आ.पाटील यांच्यासोबत डॉ.ममता पाटील, अधिष्ठाता डॉ.विजय पाटील, डेंटल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अरुण डोडामणी, डॉ.बी.एम. रुडगी, डॉ.मनोज कोल्हे, डॉ.नितीन कुलकर्णी, डॉ.के. गिंदोडीया, डॉ.गोयल, डॉ.रेशमा होलीकट्टी, डॉ.चिदंबर यांच्यासह जवाहर मेडीकल व डेंटल कॉलेजचे तज्ञ डॉक्टर आणि स्टॉफ आदी उपस्थित होते.

**मानसिकदृष्ट्या समुपदेशन-** कोरोना आणि म्युकरमायकोसिस या आजारामुळे रुग्ण मानसिकदृष्ट्या खचून जातो. अशा रुग्णांना मानसिक आधार देत त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी व मानसिकदृष्ट्या सुदृढ व्हावेत म्हणून जवाहर मेडीकल फौंडेशनकडून या रुग्णांचे समुपदेशनही करण्यात येणार आहे. त्यामुळे वैद्यकिय उपचाराबरोबर मानसिक समुपदेशनही येथे होणार आहे.

लोकमत



जवाहर फाऊडेशनमध्ये उत्तर महाराष्ट्रातील पहिले उपचार केंद्र

# म्युकरमायकोसिस रुग्णांसाठी १०० खाटांचा स्वतंत्र कक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** कोरोनासारख्या आजाराने रुग्ण हैराण झालेले असतांनाच दुसरीकडे म्युकरमायकोसिस या आजाराचे जीवघेणे संकट रुग्णांसमोर उभे राहीले आहे. अशा रुग्णांना अधार देण्यासाठी आता धुळ्यात आमदार कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने जवाहर मेडीकल फाऊंडेशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने १०० खाटांचे अद्ययावत कक्ष सुरु केला असून या ठिकाणी दिवसरात्र तज्ञ डॉक्टर म्युकरमायकोसिसच्या रुग्णांवर उपचार करणार आहेत.

दरम्यान, उत्तर महाराष्ट्रात म्युकरमायकोसिसवर उपचार करणारे धुळ्याचे जवाहर मेडीकल हे पहिले हॉस्पीटल ठरले असून यामुळे रुग्णांना चांगलाच आधार मिळाला आहे.



धुळे येथे जवाहर मेडिकल फाऊडेशनमध्ये रुग्णांची विचारपूस करताना आमदार कुणाल पाटील आणि डॉक्टर्स.

कोरोना आजारावर उपचारानंतर बरे झालेल्या रुग्णांना म्युकॉरमायकोसिस या जीवघेण्या आजाराची लागण होत आहे. धुळे जिल्ह्यातही रुग्ण आढळत आहेत. नाकातला श्वास कोंडणे, काळ्या बुरशीचा चट्टा नाक, टाळू येथे आढळणे, डोळा दुखणे, सुजणे, दृष्टी कमकुवत होणे अशी लक्षणे आढळून येतात. तत्काळ उपचार झाल्यास रुग्ण बरा होतो अन्यथा डोळा गमवावा लागतो. तर काहींचा मृत्यूही ओढवला जातो. अशा रुग्णांना धुळ्यातच उपचार मिळावेत आणि त्यांना आधार मिळावा म्हणून जवाहर मेडीकल फौंडेशनचे चेअरमन डॉ. भाईदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि आमदार कुणाल पाटील यांच्या पुढाकारातून डॉ. ममता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जवाहर मेडीकल फाऊंडेशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने १०० खाटांचा अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आला.

आमदार कुणाल पाटील यांच्या हस्ते रविवारी या उपचार केंद्राला सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, कोरोना काळात शेकडो रुग्णांना जीवनदान देण्यात जवाहर मेडीकल यशस्वी ठरले आहे. उद्घाटनांतर त्यांनी रुग्णांची विचारपूस केल्याने दिलासा मिळाला.

यावेळी अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, डेंटल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अरुण डोडामणी, डॉ. बी. एम. रुडगी, डॉ. मनोज कोल्हे, डॉ. नितीन कुलकर्णी, डॉ. के. गिंदोडीया, डॉ. गोयल, डॉ. रेशमा होलीकट्टी, डॉ. चिदंबर, डॉक्टर आणि कर्मचारी उपस्थित होते.

## उपचारासोबत समुपदेशनही

कोरोना आणि म्युकरमायकोसिस या आजारामुळे रुग्ण मानसिकदृष्ट्या खचून जातो. अशा रुग्णांना मानसिक आधार देत त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी व मानसिकदृष्ट्या सुदृढ व्हावेत म्हणून जवाहर मेडीकल फाऊंडेशनमध्ये रुग्णांचे समुपदेशनही करण्यात येणार आहे. त्यामुळे वैद्यकिय उपचाराबरोबर मानसिक समुपदेशनही येथे होणार आहे.

# म्युकरमायकोसिस रुग्णांना जवाहर फौंडेशनचा आधार
# आ.पाटलांच्या पुढाकाराने १०० खाटांचे अद्ययावत वार्ड

**धुळे, दि.२३- कोरोनासारख्या आजाराने रुग्ण हैराण झालेले असतांनाच दुसरीकडे म्युकरमायकोसिस या आजाराचे जीवघेणे संकट रुग्णांसमोर उभे राहीले आहे. अशा रुग्णांना आधार देण्यासाठी आता धुळयात आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने जवाहर मेडीकल फॅंडिशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल १०० खाटांचे अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आले असून या ठिकाणी दिवसरात्र तज्ञ डॉक्टर म्युकरमायकोसिसच्या रुग्णांवर उपचार करणार आहेत.**

दरम्यान, उत्तर महाराष्ट्रात १०० खाटांचे वार्ड सुरु करणारे म्युकरमायकोसिसवर उपचार करणारे धुळ्याचे जवाहर मेडीकल हे पहिले हॉस्पीटल ठरले असून यामुळे रुग्णांना चांगलाच आधार मिळाला आहे. कोरोना आजारावर उपचारानंतर बरे झालेल्या रुग्णांना म्युकॉरमायकोसिस ह्या जीवघेण्या आजाराची लागण होत आहे. या आजाराचे प्रमाण धुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळुन आले आहेत. नाकातला श्वास कोंडणे, काळ्या बुरशीचा चट्टा नाक, टाळू येथे आढळणे, डोळा दुखणे, सुजणे दृष्टी कमजोर होणे अशी लक्षणे



आढळून येतात. तत्काळ उपचार झाल्यास रुग्ण बरा होतो अन्यथा डोळा गमवावा लागतो तर काहींचा मृत्यूही ओढवला जातो. अशा रुग्णांना धुळ्यातच उपचार मिळावेत आणि त्यांना आधार मिळावा म्हणून जवाहर मेडीकल फौंडेशनचे चेअरमन डॉ.भाईदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकारातून व डॉ.ममताताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जवाहर मेडीकल फौंडेशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने जवाहर मेडीकल येथे म्युकरमायकोसिसवर उपचार करणारे १०० खाटांचे अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आले. आ.पाटील यांच्या हस्ते आज दि.२३ मे रोजी या उपचार केंद्राला सुरुवात करण्यात आली.

यावेळी बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, मागील वर्षी कोरोना आजार आल्यानंतर रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत म्हणून जवाहर मेडीकलने पुढाकार घेवून १०० खाटांचे वार्ड (पान ४ वर)

# म्युकरमायकोसिसच्या रुग्णांना जवाहर फाउंडेशनचा आधार

## आमदार कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने शंभर खाटांचे अद्ययावत वॉर्ड; धुळ्यात उत्तर महाराष्ट्रातील पहिले उपचार केंद्र

**धुळे, ता. २३ :** कोरोनासारख्या आजाराने रुग्ण हैराण झालेले असतानाच दुसरीकडे म्युकरमायकोसिस या आजाराचे जीवघेणे संकट रुग्णांसमोर उभे राहिले आहे. अशा रुग्णांना आधार देण्यासाठी आता धुळ्यात आमदार कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने जवाहर मेडिकल फाउंडेशन आणि डेंटल कॉलेजकडून तब्बल शंभर खाटांचे अद्ययावत वॉर्ड सुरू केले आहे. या ठिकाणी दिवसरात्र तज्ज्ञ डॉक्टर म्युकरमायकोसिसच्या रुग्णांवर उपचार करणार आहेत. उत्तर महाराष्ट्रात शंभर खाटांचे वॉर्ड सुरू करणारे व उपचार करणारे धुळ्याचे जवाहर मेडिकल हे पहिले हॉस्पिटल ठरले असून, यामुळे रुग्णांना चांगलाच आधार मिळाला आहे.

कोरोना आजारावर उपचारानंतर बरे झालेल्या रुग्णांना म्युकरमायकोसिस या जीवघेण्या आजाराची लागण होत आहे. या आजाराचे प्रमाण धुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळले आहे. त्यात नाकातला श्वास कोंडणे, काळ्या बुरशीचा चट्टा नाक, टाळू येथे आढळणे, डोळा दुखणे, सुजणे, दृष्टी कमजोर होणे, अशी लक्षणे आढळतात. तत्काळ उपचार झाल्यास रुग्ण बरा होतो अन्यथा डोळा गमवावा लागतो, तर काहींचा मृत्यूही ओढवतो. अशा रुग्णांना धुळ्यातच उपचार मिळावेत आणि त्यांना आधार मिळावा म्हणून जवाहर मेडिकल फाउंडेशनचे चेअरमन आण्णासाहेब डॉ. भाईदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि आमदार कुणाल पाटील यांच्या पुढाकारातून व डॉ. ममता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (ता. २३) या उपचार केंद्राला सुरवात झाली.

या वेळी आमदार पाटील यांनी सांगितले, की गेल्या वर्षी कोरोना आजार आल्यानंतर रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत म्हणून जवाहर मेडिकलने पुढाकार घेऊन शंभर खाटांचे वॉर्ड सुरू केले होते. त्यानंतर यंदा कोरोनाचे रुग्ण वाढल्याने उपचारासाठी खाटांचीही संख्या वाढविली. त्यामुळे शेकडो रुग्णांना जीवदान देण्यात जवाहर मेडिकल यशस्वी ठरले आहे. महाराष्ट्रात पहिले म्युकरमायकोसिसवर उपचारासाठी शंभर खाटांचे वॉर्ड सुरू केले आहे. म्युकरमायकोसिस आजाराच्या निदानासाठी डॉ. ममता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक येथे उपचार करणार आहेत. केंद्राच्या उद्‍घाटनानंतर स्वतः आमदार पाटील यांनी वॉर्डमध्ये जाऊन रुग्णांची विचारपूस केली. या वेळी डॉ. पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, डेंटल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. अरुण डोडामणी, डॉ. बी. एम. रुडगी, डॉ. मनोज कोल्हे, डॉ. नितीन कुलकर्णी, डॉ. के. गिंदोडिया, डॉ. गोयल, डॉ. रेशमा होलीकट्टी, डॉ. चिदंबर यांच्यासह जवाहर मेडिकल व डेंटल कॉलेजचे तज्ज्ञ डॉक्टर आणि स्टॉफ आदी उपस्थित होते.

### मानसिकदृष्ट्या समुपदेशनही होणार

कोरोना आणि म्युकरमायकोसिस या आजारामुळे रुग्ण मानसिकदृष्ट्या खचून जातो. अशा रुग्णांना मानसिक आधार देत त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी व मानसिकदृष्ट्या सुदृढ व्हावेत म्हणून जवाहर मेडिकल फाउंडेशनकडून या रुग्णांचे समुपदेशनही करण्यात येणार आहे. त्यामुळे वैद्यकीय उपचाराबरोबर मानसिक समुपदेशनही येथे होणार आहे.



**धुळे : येथील जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या हॉस्पिटलमधील म्युकरमायकोसिसच्या वॉर्डातील रुग्णांची विचारपूस करताना आमदार कुणाल पाटील, डॉ. ममता पाटील आदी.**

# जवाहर फाऊंडेशनमध्ये १०० खाटांची व्यवस्था

## म्युकरमायकोसिसच्या रुग्णांना जवाहर फाऊंडेशनचा आधार



**आ. कुणाल पाटील यांच्या प्रयत्नांना यश**

**धुळे** - कोरोनासारख्या आजाराने रुग्ण हैराण झालेले असतांनाच दुसरीकडे म्युकरमायकोसिस या आजाराचे जीवघेणे संकट रुग्णांसमोर उभे राहीले आहे. अशा रुग्णांना अधार देण्यासाठी आता धुळ्यात आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने जवाहर मेडीकल फॉंडेशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल १०० खाटांचे अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आले असून या ठिकाणी दिवसरात्र तज्ञ डॉक्टर म्युकरमायकोसिसच्या रुग्णांवर उपचार करणार आहेत. दरम्यान उत्तर महाराष्ट्रात १०० खाटांचे वार्ड सुरु करणारे म्युकरमायकोसिसवर उपचार करणारे धुळ्याचे जवाहर मेडीकल हे पहिले हॉस्पीटल ठरले असून यामुळे रुग्णांना चांगलाच आधार मिळाला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, कोरोना आजार झाल्यानंतर रुग्णांना म्युकरमायकोसिस या आजाराचे लक्षणे जाणवू लागतात कोरोना आजारावर उपचारानंतर बरे झालेल्या रुग्णांना म्युकॉरमायकोसिस ह्या जीवघेण्या आजाराची लागण होत आहे. या आजाराचे प्रमाण धुळे जिल्हयात मोठ्या प्रमाणात आढळुन आले आहेत. नाकातला श्वास कोंडणे, काळ्या बुरशीचा चट्टा नाक, टाळू येथे आढळणे, डोळा दुखणे, सुजणे दृष्टी कमजोर होणे अशी लक्षणे आढळून येतात. तत्काळ उपचार झाल्यास रुग्ण बरा होतो अन्यथा डोळा गमवावा लागतो तर काहींचा मृत्यूही ओढवला जातो अशा रुग्णांना धुळ्यातच उपचार मिळावेत आणि त्यांना आधार मिळावा म्हणून जवाहर मेडीकल फौंडेशनचे चेअरमन आण्णासाहेब डॉ.भाईदास पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकारातून व डॉ.ममताताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जवाहर मेडीकल फौंडेशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने जवाहर मेडीकल येथे म्युकरमायकोसिसवर उपचार करणारे १०० खाटांचे अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आले. आ. कुणाल पाटील यांच्या हस्ते काल दि.२३ मे रोजी या उपचार केंद्राला सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलतांना आ.कुणाल पाटील यांनी सांगितले कि, मागील वर्षी कोरोना आजार आल्यानंतर रुग्णांना तातडीने पान ५ वर ›››

**धुळ्यात उत्तर महाराष्ट्रातील पहिले उपचार केंद्र**

### मानसिकदृष्ट्या समुपदेशन

कोरोना आणि म्युकरमायकोसिस या आजारामुळे रुग्ण मानसिकदृष्ट्या खचून जातो. अशा रुग्णांना मानसिक आधार देत त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी व मानसिकदृष्ट्या सुदृढ व्हावेत म्हणून जवाहर मेडीकल फौंडेशनकडून या रुग्णांचे समुपदेशनही करण्यात येणार आहे. त्यामुळे वैद्यकिय उपचाराबरोबर मानसिक समुपदेशनही येथे होणार आहे.

# म्युकरमायकोसिसच्या रुग्णांना जवाहर फौंडेशनचा आधार

# आ.कुणाल पाटलांच्या पुढाकाराने १०० खाटांचे अद्ययावत वार्ड

## धुळ्यात उत्तर महाराष्ट्रातील पहिले उपचार केंद्र



**धुळे-** कोरोनासारख्या आजाराने रुग्ण हैराण झालेले असतांनाच दुसरीकडे म्युकरमायकोसिस या आजाराचे जीवघेणे संकट रुग्णांसमोर उभे राहीले आहे. अशा रुग्णांना अधार देण्यासाठी आता धुळ्यात आ.कुणाल पाटील यांच्या पुढाकाराने जवाहर मेडीकल फौंडेशन आणि डेंटल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल १०० खाटांचे अद्ययावत वार्ड सुरु करण्यात आले असून या ठिकाणी दिवसरात्र तज्ञ डॉक्टर म्युकरमायकोसिसच्या रुग्णांवर उपचार करणार आहेत. दरम्यान उत्तर महाराष्ट्रात १०० खाटांचे वार्ड सुरु करणारे म्युकरमायकोसिसवर उपचार करणारे धुळ्याचे जवाहर मेडीकल हे पहिले हॉस्पीटल ठरले असून यामुळे रुग्णांना चांगलाच आधार मिळाला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, कोरोना आजार झाल्यानंतर रुग्णांना म्युकरमायकोसिस या आजाराचे लक्षणे जाणवू लागतात कोरोना आजारावर उपचारानंतर बरे झालेल्या रुग्णांना म्युकॉरमायकोसिस ह्या जीवघेण्या आजाराची लागण होत आहे. या आजाराचे प्रमाण धुळे जिल्हयात मोठ्या प्रमाणात आढळुन आले आहेत. नाकातला श्वास कोंडणे, काळ्या बुरशीचा चट्टा नाक, टाळू येथे आढळणे, (पान ४ वर)

# खान्देशातील रुग्णांवर जवाहर फाउंडेशनच्या कोविड सेंटरमध्ये यशस्वी उपचार

**धुळे (प्रतिनीधी)** - १५ ऑगस्टपासून धुळे शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील कोरोना रुग्णांवर जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये यशस्वीपणे उपचार केले जात आहेत. कोरोनाचे गंभीर स्वरुप त्यात रुग्णांचा बेड उपलब्ध करुन घेण्यासाठी कस लागत आहे.

यासर्व बाबी पहाता जवाहर मेडिकल फाउंडेशनचे कोविड हेल्थ केअर सेंटर रुग्णांच्या सेवेत दाखल झाले आहे. गेल्या तीस वर्षापासून खानदेशातील रुग्णसेवेत अग्रेसर असणाऱ्या हॉस्पिटलमध्ये कोविड काळात ११० बेडेड डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर सुरू करण्यात आले होते या सेंटरमध्ये ३०० हून अधिक रुग्णांवर आम्ही यशस्वीपणे उपचार केलेत आता कोरोनाची दुसरी लाट आलेली आहे ज्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते आहे, कोरोनाचा वाढता प्रसार पाहता आमच्या हॉस्पिटलमध्ये सर्व सुविधांनी सुसज्ज असे २५० बेडेड कोविड हेल्थ केअर सेंटर पुन्हा रुग्णांच्या सेवेत दाखल झाले आहे. ज्यात कोविड ऑक्सीजनचे १२०, कोविड अतिदक्षता

## आरटीपीसीआर चाचणी, एचआरसीटीही अल्पदरात

विभागात ३०, जनरल कोविड विभाग १०० असे एकूण २५० बेडेड असलेले स्वतंत्र विभाग उपलब्ध आहेत. कोविडच्या या गंभीर परिस्थितीत अल्पदरात आम्ही रुग्णांवर उपचार करीत आहोत.

तसेच कोविडसाठी अत्यावश्यक असणारी आरटीपीसीआर तपासणी ५०० रूपये, रॅपीड अँन्टीजन टेस्ट १५० रूपये व एचआरसीटी तपासणी अहवाल २५०० रूपये या शासनाने निर्देशित केलेल्या दरानुसार उपलब्ध असून चोविस तासात रिपोर्ट रुग्णांस मिळणार आहे. आरटीपीसीआर चाचणी करण्यासाठी रुग्णांचे नमुने धुळे शहरातील कुठल्याही हॉस्पिटल,



क्लिनीक तसेच थेट रुग्णांच्या घरून देखील घेता येणार आहेत ज्यामुळे शहरातील व ग्रामीण भागातील रुग्णांना सदर सुविधा सुलभ होणार आहे. तरी सदर सेवांचा कोविडग्रस्त रुग्णांनी अवश्य लाभ घ्यावा असे अवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, डॉ.ममता पाटील, सहसचिव संगिता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील कोविड विभागप्रमुख डॉ. रोहन कुलकर्णी आदींनी केले आहे.

# शहरात जवाहर फाउंडेशनमध्ये कोविड रुग्णांसाठी २५० बेडचा स्वतंत्र विभाग

**प्रतिनिधी** | धुळे



शहरातील जवाहर फाउंडेशनच्या रुग्णालयात केलेला कोविड वॉर्ड.

येथील जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये कोरोनाबाधितांवर उपचार केले जात आहे. या ठिकाणी २५० बेडचा स्वतंत्र कोविड विभाग सुरू करण्यात आला आहे. या ठिकाणी उपचार घेतल्यानंतर अनेकांनी कोरोनावर मात केली आहे.

कोरोनाची दुसरी लाट सुरू आहे. बेड मिळवण्यासाठी रुग्णाच्या नातेवाइकांची धावपळ होते आहे. जवाहर मेडिकल फाउंडेशनने कोरोनाची पहिली लाट सुरू झाल्यावर ११० बेडचे डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर सुरू केले होते. या सेंटरमध्ये ३००पेक्षा अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले. त्यानंतर आता या ठिकाणी २५० बेडचे कोविड हेल्थ केअर सेंटर सुरू करण्यात आले आहे. त्यात ऑक्सिजनचे १२०, कोविड अतिदक्षता विभागात ३०, जनरल कोविड विभाग १०० बेड आहे. विशेष म्हणजे अल्पदरात उपचार करण्यात येत आहे. तसेच आरटीपीसीआर, रॅपिड अँटिजेन तपासणी, एचआरसीटी तपासणी शासनाच्या दरानुसार केली जात असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, डॉ. ममता पाटी[ल] सहसचिव संगीता पाटील, अधिष्ठ[ाता] डॉ. विजय पाटील, कोविड विभागप्रमु[ख] डॉ. रोहन कुलकर्णी आदींनी दिली.

**रुग्णांना दिलासा**

जवाहर मेडिकल फाउंडेशन सेवा [...] आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागात[ील] रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

# आणखी २५० बेडचे कोविड केअर सेंटर सुरू

## जवाहर मेडीकल फाउंडेशनचा रूग्णांना दिलासा ; आतापर्यंत ३०० रूग्णावर यशस्वी उपचार

■ धुळे । प्रतिनिधी



शहरातील जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये आणखी २५० बेडचे कोविड हेल्थ केअर सेंटर सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे रूग्णांना दिलासा मिळाला आहे. आतापर्यंत येथे ३०० रूग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहे.

शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील कोरोना रूग्णांवर जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये यशस्वीपणे उपचार केले जात आहेत. कोरोनाचे गंभीर स्वरूप त्यात रूग्णांचा बेड उपलब्ध करून घेण्यासाठी कस लागत आहे. यासर्व बाबी पहाता जवाहर मेडिकल फाउंडेशनचे कोविड हेल्थ केअर सेंटर रूग्णांच्या सेवेत दाखल झाले आहे. या हॉस्पिटलमध्ये कोविड काळात ११० बेडेड डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर सुरू करण्यात आले होते. या सेंटरमध्ये ३०० हून अधिक रूग्णांवर यशस्वीपणे उपचार करण्यात आले. आता कोरोनाची दुसरी लाट आलेली आहे ज्यामुळे जिल्ह्यातील रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते आहे, कोरोनाचा वाढता प्रसार पाहता हॉस्पिटलमध्ये सर्व सुविधांनी सुसज्ज असे २५० बेडेड कोविड हेल्थ केअर सेंटर पुन्हा रूग्णांच्या सेवेत दाखल झाले आहे. ज्यात कोविड ऑक्सीजनचे १२०, कोविड अतिदक्षता विभागात ३०, जनरल कोविड विभाग १०० असे एकूण २५० बेडेड असलेले स्वतंत्र विभाग उपलब्ध आहेत. कोविडच्या या गंभीर परिस्थितीत अल्पदरात रूग्णांवर उपचार केले जात आहेत. तसेच कोविडसाठी अत्यावश्यक असणारी आरटीपीसीआर तपासणी, रॅपीड अ‍ॅन्टीजन टेस्ट व एचआरसीटी तपासणी अहवाल या शासनाने निर्देशित केलेल्या दरानुसार उपलब्ध असून चोविस तासात रिपोर्ट रूग्णांस मिळणार आहे. आरटीपीसीआर चाचणी करण्यासाठी रूग्णांचे नमुने शहरातील कुठल्याही हॉस्पिटल, क्लिनीक तसेच थेट रूग्णांच्या घरून देखील घेता येणार आहेत. ज्यामुळे शहरातील व ग्रामीण भागातील रूग्णांना सदर सुविधा सुलभ होणार आहे.

तरी या सेवांचा कोविडग्रस्त रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, उपाध्यक्ष तथा आ. कुणाल पाटील, डॉ.ममता पाटील, सहसचिव संगिता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, कोविड विभागप्रमुख डॉ. रोहन कुलकर्णी आदींनी केले आहे.



# मराठा क्रांती मोर्चातर्फे जवाहर मेडिकल फाउंडेशनचा सन्मान

## डॉ.ममता पाटील, डॉ.विजय पाटील, संगिता पाटील यांना शिवप्रतिमा भेट

**धुळे । (प्रतिनिधी) :** कोविडच्या कठीण काळात जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या टिमने दिवसरात्र अतुलनीय काम केल्याबददल मराठा क्रांती मोर्चा, धुळे जिल्हा यांच्यातर्फे डॉ. ममता पाटील, अधिष्ठाता डॉ.विजय पाटील, संगिता पाटील यांचा शिवप्रतिमा भेट देवून सन्मान करण्यात आला.

यावेळी मराठा क्रांती मोर्चाचे कार्याध्यक्ष प्रदीप जाधव यांनी संस्थेच्या कामाचे कौतुक करत जवाहर मेडिकल फाउंडेशनच कोविडच्या कठीण काळात देत असलेल्या योगदानाचे कौतुक केले. सचिव निंबा मराठे यांनीही आमदार कुणाल पाटील यांच्या मागदर्शनाखाली जवाहर मेडिकल फाउंडेशनची पूर्ण टिम दिवसरात्र राबत असल्याचे कौतुक केले. जात, धर्म, पंथ, भाषा, लिंग या पलिकडे जावून जवाहर मेडिक्ल फाउंडेशन अप्रतिम काम करीत असल्याची भावना व्यक्त केली. या कामाचा गौरव व्हावा म्हणून मराठा क्रांती मोर्चा, धुळे जिल्हयातर्फे सत्कार करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.याप्रसंगी डॉ.ममता पाटील, सहसचिव संगिता पाटील, अधिष्ठाता डॉ.विजय पाटील यांचा शिवप्रतिमा देवून सन्मान करण्यात आला. यावेळी मराठा क्रांती मोर्चाचे कार्याध्यक्ष प्रदीप जाधव, सचिव निंबा मराठे, खजिनदार वीरेंद्र मोरे, सुधाकर बेंद्रे, अशोक सुडके, राहुल गायकवाड, विनोद जगताप, रवींद्र शिंदे, अर्जुन पाटील, संदीप शिंदे, संदीप पाटोळे, उल्हास यादव, नाना कदम, गिरीश चव्हाण,प्रकाश चव्हाण, शाम रायगुडे, शाम निरगुडे, डॉ. संजय पाटील, चंद्रकांत थोरात, विनोद जगताप, निंबा मराठे, राकेश काकुस्ते, विवेक रवंदळे आदी उपस्थित होते. याप्रसंगी प्रास्ताविक मराठा क्रांती मोर्चाचे कार्याध्यक्ष निंबा मराठे यांनी केले. आभार जनसंपर्क अधिकारी प्रवीण खरे यांनी मानले.

दैनिक श्रमराज्य

# कोविडग्रस्त रुग्णांवर 'जवाहर'च्या कोविड सेंटरमध्ये यशस्वी उपचार



धुळे (श्रमराज्य.कॉम)-१५ ऑगस्टपासून धुळे शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील कोरोना रुग्णांवर जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये यशस्वीपणे उपचार केले जात आहेत. कोरोनाचे गंभीर स्वरुप त्यात रुग्णांचा बेड उपलब्ध करून घेण्यासाठी कस लागत आहे. यासर्व बाबी पहाता जवाहर मेडिकल फाउंडेशनचे कोविड हेल्थ केअर सेंटर रुग्णांच्या सेवेत दाखल झाले आहे. गेल्या तीस वर्षापासून खानदेशातील रुग्णसेवेत अग्रेसर असणाऱ्या हॉस्पिटलमध्ये कोविड काळात ११० बेडेड डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर सुरू करण्यात आले होते या सेंटरमध्ये ३०० हून अधिक रुग्णांवर आम्ही यशस्वीपणे उपचार केलेत आता कोरोनाची दुसरी लाट आलेली आहे ज्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते आहे, कोरोनाचा वाढता प्रसार पाहता आमच्या हॉस्पिटलमध्ये सर्व सुविधांनी सुसज्ज असे २५० बेडेड कोविड हेल्थ केअर सेंटर पुन्हा रुग्णांच्या सेवेत दाखल झाले आहे. ज्यात कोविड ऑक्सीजनचे १२०, कोविड अतिदक्षता विभागात ३०, जनरल कोविड विभाग १०० असे एकूण २५० बेडेड असलेले स्वतंत्र विभाग उपलब्ध आहेत. कोविडच्या या गंभीर परिस्थितीत अल्पदरात आम्ही रुग्णांवर उपचार करीत आहोत. तसेच कोविडसाठी अत्यावश्यक असणारी आरटीपीसीआर तपासणी ५००/-, रॅपीड अँन्टीजन टेस्ट १५०/- व एचआरसीटी तपासणी अहवाल २५००/- या शासनाने निर्देशित केलेल्या दरानुसार उपलब्ध असून चोविस तासात रिपोर्ट रुग्णांस मिळणार आहे.

*कोविडसारख्या कठीण काळात रुग्णांना तात्काळ व अल्पदरात सेवा जवाहर मेडिकल फाउंडेशन देत आहे ज्यामुळे रुग्णांना वेळेत उपचार मिळत असून शहरी तसेच ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.*
**-जिजाबराव पाटील**, *वारुळ*

*जवाहर मेडिकल फाउंडेशनची संपूर्ण टिम, डॉक्टर्स तसेच नर्सेस यांच्याकडून रुग्णांना चोविस तास उत्तम सेवा दिली जात आहे. तसेच कोविडग्रस्त रुग्णांना योग्य उपचार व मार्गदर्शन स्टॉफकडून दिले जात आहे.*
**-सुनंदा पाटील**, *बोरीस*

आरटीपीसीआर चाचणी करण्यासाठी रुग्णांचे नमुने धुळे शहरातील कुठल्याही हॉस्पिटल, क्लिनीक तसेच थेट रुग्णांच्या घरून देखील घेता येणार आहेत ज्यामुळे शहरातील व ग्रामीण भागातील रुग्णांना सदर सुविधा सुलभ होणार आहे. तरी सदर सेवांचा कोविडग्रस्त रुग्णांनी अवश्य लाभ घ्यावा असे अवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, डॉ.ममता पाटील, सहसचिव संगिता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील कोविड विभागप्रमुख डॉ. रोहन कुलकर्णी आदींनी केले आहे.

गुरुवार,दि.६-५-२०२१

दैनिक श्रमराज्य

# कोविडनंतर होतो बुरशीजन्य आजार रूग्णांचे डोळे,अवयव होतात निकामी

धुळे (श्रमराज्य.कॉम)–धुळे शहरात विविध रुग्णालयातून पोस्ट कोविड म्युकॉरमायकोसिस (कोविडनंतर आढळणारा बुरशीजन्य आजार) हा आजार असलेले रुग्ण मोठया प्रमाणात दिसून येत आहेत. उपरोक्त आजार कोविड झाल्यानंतर बरे होवून घरी गेलेल्या रुग्णांमध्ये आढळून येतो. हा आजार बुरशी (fungal infection) या जंतूंमुळे होतो. या आजाराचे लवकर निदान झाले तर तो पूर्णपणे बरा होतो. अन्यथा उपरोक्त जंतूसंसर्गामुळे डोळा गमवावा लागू शकतो. कधीकधी हा आजार जीवघेणाही ठरू शकतो. त्यामुळे लक्षणांची सुरवात झाली की, लगेचच दंतवैद्यक, तसेच नाक, कान घसा तज्ञ यांना सर्वप्रथम दाखविणे आवश्यक आहे.

या आजाराची सुरवात नाकापासून होते. मग टाळू, डोळे तसेच मेंदूपर्यत तो पसरतो. म्युकॅारमायकोसिस लागण संसर्गजन्य नाही म्हणजे एकापासून दुसऱ्याला, प्राण्यांपासून माणसाला त्याची लागण होत नाही. गेल्या महिन्याभरात एसीपीएम मेडिकल कॉलेजमध्ये कान, नाक घसा विभाग तसेच दंतरोग विभागात या आजाराचे सुमारे ५५ रुग्ण दाखल झालेले आहेत. त्यातील ४९ रूग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे. अद्याप ६ रूग्णांवर शस्त्रक्रिया होणे बाकी आहे. दरम्यान या आजारांवरील उपचारासाठी जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलच्या कान, नाक, घसा विभागाचे विभागप्रुख डॉ. आर.व्ही.पाटील, डेंटल कॉलेजच्या ओरल मॅक्सिफेशियल सर्जरी विभागाचे विभाप्रमुख डॉ.बी.एम.रूडगी, प्रा.शरण बसप्पा प्रयत्न करीत आहेत. जवाहर मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, सहसचिव संगिता पाटील, डॉ.ममता पाटील, डिन डॉ.विजय पाटील, डेंटलचे डीन डॉ.अरूण दोडामनी यांच्या सहकार्याने म्युकरमायकोसिसच्या रुग्णांकरीता २० बेडचा स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आलेला आहे.

**या आजाराचे टप्पे**

स्टेज १– नाकापर्यंत मर्यादित नाक व सायनसेस

स्टेज २ – डोळयापर्यंत पसरणे

स्टेज ३ – मेंदूपर्यंत पसरणे

**म्युकॅारमायकोसिसचा धोका कोणाला ?**

अनियंत्रित मधुमेह, अवयव प्रत्यारोपण झालेल्या, स्टेरॉईड ड्रग्ज दिलेल्या, कोविड होवून बरे झालेल्या रुग्णांना म्हणजे एकंदरीत ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत आहे अशा लोकांना म्युकरमयकॉसिसचा जास्त धोका आहे.

**म्युकॅारमायकोसिसची लक्षणे कोणती?**

नाकातला श्वास कोंडणे, काळ्या बुरशीचा चटटा नाक, टाळू (हार्ड पॅलेट) येथे आढळणे, दात व गाल दुखणे व सुजणे, चेहऱ्याच्या हाडांना असहय वेदना होणे, डोळा दुखणे व सुजणे तसेच दृष्टी कमजोर होणे.

**म्युकॅारमायकोसिस चे निदान कसे करावे**

मौखिक तपासणी, सिटीस्कॅन, नाकाची इंडॉस्कॉपी व बायोप्सीच्या साह्याने आपण लवकर म्युकॅारमायकोसिसचे निदान करू शकतो त्यामुळे वरील लक्षणे आढळल्यास त्वरित आपण दंत व मुख्य आरोग्य विशेष तज्ञ सल्ला घेणे आवश्यक आहे.

**म्युकॅारमायकोसिस वर उपचार काय?**

कोविड झालेल्या रूग्णांनी सौम्य बिटाडीन नाकाचे ड्रॉप तसेच नॉर्मल सलाईन, नसल स्प्रे दिवसातून ३ वेळा नाकात टाकल्यास आपण हा बुरशीचा आजार रोखू शकतो. तातडीने निदान करून -ntifungal therapy d संसर्ग शरीराच्या इतर अवयावापर्यंत पोहोचला असल्यास शस्त्रक्रिया करण्याची गरज पडू शकते.

***कोविड झालेल्या रूग्णांनी मौखिक तपासणी करणे आवश्यक***



*त्यामुळे कोविड मधुन बरे झालेल्या रुग्णांनी आणि खास करून सोबत मधुमेह आणि इतर आजार असलेल्या रुग्णांनी एकदा मुख आरोग्य तपासणी न चुकता करून घ्यावी कारण पुढे निस्तारण्यापेक्षा वेळेवर काळजी घेतलेली बरी.कोविड १९ चे उपचार करणाऱ्या सर्व डॉक्टर्स ला माझी कळकळीची विनंती आहे की सर्व बरे झालेले आणि मधुमेह असणाऱ्या रुग्णांना मुख आरोग्य तपासणी करण्याचा सल्ला द्यावा. सर्व दंत चिकित्सक विनंती करतो की दातासंबंधी तक्रार घेऊन येणाऱ्या अश्या रुग्णांची योग्य प्रकारे तपासणी करून त्यांना योग्य सल्ला द्यावा.*

**-डॉ.बी.एम.रूडगी**, विभाग प्रमुख,
ओरल मॅक्सिलोफेशियल सर्जरी, एसीपीएम दंतवैद्यकीय महाविद्यालय

# कोविडनंतर बुरशीजन्य आजाराचा धोका जवाहरमध्ये ४९ रुग्णांवर झाली शस्त्रक्रिया



**धुळे । (खान्देश मैदान वृत्तसेवा) :** धुळे शहरात विविध रुग्णालयातून पोस्ट कोविड म्युकॉरमायकोसिस (कोविडनंतर आढळणारा बुरशीजन्य आजार) हा आजार असलेले रूग्ण मोठया प्रमाणात दिसून येत आहेत.हा आजार कोविड झाल्यानंतर बरे होवून घरी गेलेल्या रूग्णांमध्ये आढळून येतो. हा आजार बुरशीमुळे होतो. या आजाराचे लवकर निदान झाले तर तो पूर्णपणे बरा होतो. अन्यथा डोळा गमवावा लागू शकतो. कधीकधी हा आजार जीवघेणाही ठरू शकतो. त्यामुळे लक्षणांची सुरवात झाली की, लगेचच दंतवैद्यक, तसेच नाक, कान घसा तज्ञ यांना सर्वप्रथम दाखविणे आवश्यक आहे. या आजाराची सुरवात नाकापासून होते. मग टाळू, डोळे तसेच मेंदूपर्यत तो पसरतो. म्युकॅारमायकोसिस लागण संसर्गजन्य नाही म्हणजे एकापासून दुसऱ्याला, प्राण्यांपासून माणसाला त्याची लागण होत नाही.गेल्या महिन्याभरात एसीपीएम मेडिकल कॉलेजमध्ये कान, नाक घसा विभाग तसेच दंतरोग विभागात या आजाराचे सुमारे ५५ रुग्ण दाखल झालेले आहेत. त्यातील ४९ रूग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आलेली आहे. अद्याप रूग्णांवर शस्त्रक्रिया होणे बाकी आहे.दरम्यान या आजारांवरील उपचारासाठी जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलच्या कान, नाक, घसा विभागाचे विभागप्रुख डॉ. आर.व्ही.पाटील, डेंटल कॉलेजच्या ओरल मॅक्सिफेशियल सर्जरी विभागाचे विभाप्रमुख डॉ.बी.एम. रूडगी, प्रा.शरण बसप्पा प्रयत्न करीत आहेत.जवाहर मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील, उपाध्यक्ष तथा आमदार कुणाल पाटील, सहसचिव संगिता पाटील, डॉ.ममता पाटील, डिन डॉ.विजय पाटील, डेंटलचे डीन डॉ.अरूण दोडामनी यांच्या सहकार्याने म्युकरमायकोसिसच्या रूग्णांकरीता २० बेडचा स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आलेला आहे.अनियंत्रित मधुमेह, अवयव प्रत्यारोपण झालेल्या, स्टेरॉईड ड्रग्ज दिलेल्या, कोविड होवून बरे झालेल्या रूग्णांना म्हणजे एकंदरीत ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत आहे अशा लोकांना म्युकरमयकॉसिसचा जास्त धोका आहे. नाकातला श्वास कोंडणे, काळ्या बुरशीचा चट्टा नाक, टाळू (हार्ड पॅलेट) येथे आढळणे, दात व गाल दुखणे व सुजणे, चेह-याच्या हाडांना असहय वेदना होणे, डोळा दुखणे व सुजणे तसेच दृष्टी कमजोर होणे ही या आजाराची लक्षणे आहेत. मौखिक तपासणी, सिटीस्कॅन, नाकाची इंडॉस्कॉपी व बायोप्सीच्या साह्याने आपण लवकर म्युकॅारमायकोसिसचे निदान करू शकतो त्यामुळे वरील लक्षणे आढळल्यास त्वरित आपण दंत व मुख्य आरोग्य विशेष तज्ञ सल्ला घेणे आवश्यक आहे.कोविड झालेल्या रूग्णांनी सौम्य बिटाडीन नाकाचे ड्रॉप तसेच नॉर्मल सलाईन, नसल स्प्रे दिवसातून ३ वेळा नाकात टाकल्यास आपण हा बुरशीचा आजार रोखू शकतो.

तातडीने निदान करून Antifungal therapy -व संसर्ग शरीराच्या इतर अवयावापर्यंत पोहोचला असल्यास शस्त्रक्रिया करण्याची गरज पडू शकते.कोविड झालेल्या रूग्णांनी मौखिक तपासणी करणे आवश्यक त्यामुळे कोविड मधुन बरे झालेल्या रूग्णांनी आणि खास करून सोबत मधुमेह आणि इतर आजार असलेल्या रुग्णांनी एकदा मुख आरोग्य तपासणी न चुकता करून घ्यावी कारण पुढे निस्तारण्यापेक्षा वेळेवर काळजी घेतलेली बरी.कोविड १९ चे उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सर्व बरे झालेले आणि मधुमेह असणाऱ्या रूग्णांना मुख आरोग्य तपासणी करण्याचा सल्ला द्यावा. असे आवाहन एसीपीएम दंत वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ.बी.एम. रुडगी यांनी केले आहे.

# सिंचन प्रकल्पांसाठी संदीप बेडसेंनी घेतली ना.जयंत पाटील यांची भेट

**धुळे । (खान्देश मैदान वृत्तसेवा) :** शिंदखेडा तालुक्यातील २६ गावांचा जिव्हाळ्याचा विषय म्हणजे 'सहकारी उपसा सिंचन योजना. मागील अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या उपसासिंचन योजना पुन्हा सुरू करण्याबाबत हजारो लाभार्थी शेतकऱ्यांची ईच्छा पूर्ण झाल्यास शिंदखेडा तालुक्यातील २६ गावातल्या हजारो हेक्टर क्षेत्र हे सिंचनाखाली येऊन शेतकऱ्यांना दुष्काळाचा करावा लागणारा सामना संपुष्टात येईल या उद्देशाने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संदिप बेडसे यांनी वरील विषयाकरीता राज्याचे जलसंपदा व लाभक्षेत्र मंत्री जयंतराव पाटील यांच्याशी भेट घेऊन शिंदखेडा मतदारसंघातील ८ व नंदुरबार जिल्ह्यातील१४ सहकारी उपसा सिंचन योजना चालू करण्याचे साकडे घातले आहे.. यामुळे प्रकाशा व सारंगखेडा बॅरेजमधील ९०.५० दलघमी पाण्यामुळे शिंदखेडा मतदारसंघातील ८ उपसा सिंचन योजनेअंतर्गत २६ गावातील ३१५७ लाभार्थी शेतकरी बांधवांचे ५२२३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे तसेच नंदुरबार जिल्ह्यातील१४ उपसा सिंचन योजनेअंतर्गत ३३ गावातील हजारो लाभार्थी शेतकरी बांधवांचे ९१९० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.. यामुळे शेतकऱ्यांना बारामाही पिके घेण्यास व दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी बळ मिळेल व शेतकरी राजा सुखी होईल.संदिप बेडसे यांच्या भेटीनंतर व निवेदनानंतर ना.जयंत पाटील यांनी जलसंपदा आणि पाटबांधारे विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची पुढील आठवड्यापर्यंत बैठक घेऊन सदरील प्रलंबित समस्या प्राधान्याने सोडवण्याचे बेडसे यांना आश्वासन दिले.

सोफा, डायनींग टेबल, सोफा कमबेड, पलंग, दिवान
टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफिस टेबल,

सुविधा • मॉलेक्युलर प्रयोगशाळेस इंडियन कौन्सिल मेडिकल रिसर्चची मान्यता

# जवाहर मेडिकलमध्ये कोविड लॅब सुरू; कोरोना तपासणीचा आता एका दिवसात मिळेल अहवाल

**प्रतिनिधी** | धुळे

येथील जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये मॉलेक्युलर अर्थात कोविड लॅबचे फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. भाईदास पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. लॅब सुरू झाल्याने आता एक दिवसात कोरोना तपासणीचा अहवाल मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. माजी मंत्री रोहिदास पाटील, आमदार कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही लॅब सुरू करण्यात आली आहे.

कार्यक्रमाला डॉ. ममता पाटील, सहसचिव संगीता पाटील, अधिष्ठाता डॉ. विजय पाटील, उपअधिष्ठाता डॉ. आरती कर्णिक-महाले, डेंटल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ.अरुण दोडामणी, पॅथॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. द्रवीड, डॉ. आर.व्ही. पाटील, फार्माकॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. ए.डब्ल्यू पाटील, डॉ. मधुकर पवार, कोविड लॅबच्या प्रमुख डॉ. करुणा अहिरे, प्रशासन अधिकारी राकेश काकुस्ते आदी उपस्थित होते. जवाहर मेडिकल फाउंडेशनच्या एसीपीएम मेडिकल कॉलेजमधील डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटरमध्ये १५ ऑगस्टपासून कोरोनाबाधितांवर उपचार केले जात आहे. या ठिकाणी मॉलेक्युलर प्रयोगशाळेस इंडियन कौन्सिल मेडिकल रिसर्च (आयसीएमआर) आणि नॅशनल ॲक्रिडिएशन बोर्ड ऑफ टेस्टिंग ॲण्ड कोल्याबरेशन लॅबरोटरीजने (एनएबीएल) मान्यता दिली होती. त्यानुसार ही लॅब सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील व ग्रामीण भागातील रुग्णांना कोविडची चाचणी झाल्यानंतर त्याच दिवशी अहवाल मिळेल.



जवाहर फाउंडेशनमध्ये लॅबचे उद्घाटन करताना उपस्थित मान्यवर.